**प्रकल्प प्रवर्तक मे. सोशीयेदादे दि फोमेंतो इंडस्ट्रियल प्रायव्हेट लिमिटेड, मडगाव, गोवा राज्य यांच्या प्रस्तावित माऊली लोह खनिज ब्लॉक, गाव — रेडी (कनयाळ), तालुका — वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्ग, महाराष्ट्र येथील खाण लीज क्षेत्र २४.२६ हेक्टर, ०.३ दशलक्ष प्रतिवर्ष क्षमतेच्या लोहखनिज उत्खननाबाबतच्या प्रस्तावित प्रकल्पाबाबतच्या पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीबाबतचे इतिवृत्त -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. सोशीयेदादे दि फोमेंतो इंडस्ट्रियल प्रायव्हेट लिमिटेड, मडगाव, गोवा राज्य यांच्या प्रस्तावित माऊली लोह खनिज ब्लॉक, गाव — रेडी (कनयाळ), तालुका — वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्ग, महाराष्ट्र येथील खाण लीज क्षेत्र २४.२६ हेक्टर, ०.३ दशलक्ष प्रतिवर्ष क्षमतेच्या लोहखनिज उत्खननाबाबतच्या प्रस्तावित प्रकल्पाबाबतच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता श्री देवी माऊली पाणी पुरवठा योजना, रेडी, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा — सिंधुदुर्ग, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री राहुल दे. मोटे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी श्री मच्छिंद्र सुकटे, अपर जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती, श्री जगन्नाथ शं सांळुखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती, श्री प्रशांत पानवेकर, उप विभागीय अधिकारी-सावंतवाडी,तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्ग, श्री. ओंकार ओतारी तहसीलदार, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्ग, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार सदरहू प्रकल्प हा परिशिष्ट अ व ब मध्ये मोडत असल्याने या प्रकल्पांस पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक प्रकल्प प्रवर्तक मे. सोशीयेदादे दि फोमेंतो इंडस्ट्रियल प्रायव्हेट लिमिटेड, गोवा राज्य यांचा त्यांच्या गाव-रेडी (कनयाळ), तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्ग, महाराष्ट्र येथील खाण लीज क्षेत्र २४.२६ हेक्टर, ०.३ दशलक्ष प्रतिवर्ष क्षमतेच्या लोहखनिज उत्खनन संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक ०४-०९-२०२३ रोजी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग अ, शेड्युल नं. १ (अ) — माईन्स आणि मिनरल्समध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तक मे. सोशीयेदादे दि फोमेंतो इंडस्ट्रियल प्रायव्हेट लिमिटेड, गोवा राज्य यांना महाराष्ट्र शासनातर्फे दिनांक ०६-०४-२०२२ रोजी झालेल्या जाहीर लिलावात पसंतीचा बोलीदार म्हणून घोषित केलेले आहे. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने हेतू पत्र (एलओआय) क्रमांक MMN-0422/C.R.78/IND-9A, दिनांक २०-०५-२०२२ नुसार महाराष्ट्र राज्यातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील, गाव- रेडी (कनयाळ) गावातील लोह खनिजासाठी माऊली लोह खनिज ब्लॉक खाणपट्टा मंजूर करण्यासाठी देण्यात आलेला आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १८-११-२०२२ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक ०६-०२-२०२३ रोजी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास सोमवार , दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ११. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई- ८२/२०२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी-२३१२०१- एफटीएस -०२०६ दिनांक ०१-१२-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी,सिंधुदुर्ग, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी — प्रादेशिक अधिकारी -कोल्हापूर, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी - **आयोजक**

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक तरुण भारत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत १६-११-२०२३ रोजी जनसुनावणीबाबत प्रकाशित

केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहिती व अवलोकनार्थ खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, सिंधुदुर्ग,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, सिंधुदुर्ग,

५) उप विभागीय अधिकारी,सावंतवाडी, तालुका-सावंतवाडी,जिल्हा – सिंधुदुर्ग,

६) तहसीलदार, तहसील कार्यालय- वेंगुर्ला, तालुका- वेंगुर्ला, जिल्हा- सिंधुदुर्ग,

७) सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय – रेडी, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा- सिंधुदुर्ग,

८) संचालक,पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

९) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

१०) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर – ४१६ ००२

१०) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत नं. २, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय कपांऊड, रत्नागिरी – ४१५ ६१२

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी यांना ८० सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

त्यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. सोशीयेदादे दि फोमेंतो इंडस्ट्रियल प्रायव्हेट लिमिटेड, गोवा राज्य यांना महाराष्ट्र शासनातर्फे दिनांक ०६-०४-२०२२ रोजी झालेल्या जाहीर लिलावात

पसंतीचा बोलीदार म्हणून घोषित केलेले आहे. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने हेतू पत्र (एलओआय) क्रमांक MMN-0422/C.R.78/IND-9A, दिनांक २०-०५-२०२२ नुसार महाराष्ट्र राज्यातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील, गाव- रेडी (कनयाळ) गावातील लोह खनिजासाठी माऊली लोह खनिज ब्लॉक खाणपट्टा मंजूर करण्यासाठी देण्यात आलेला आहे.

सदरहू प्रकल्पाची एकूण गुंतवणूक ही ८ कोटी आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च अंदाजे - रुपये ५.६ लाख, तर आवर्ती खर्च - रुपये ३३.४ लाख रुपये आहे. प्रकल्पात व परिसरात हरितपट्टा विकसित करण्यात येईल. त्याचप्रमाणे गेले अनेक वर्षे स्थानिकांच्या सामाजिक गरजांसाठी वेळोवेळी खर्च करण्यात आले, ते भविष्यातही करण्यात येईल. सदरहू प्रकल्पामुळे भारत सरकार, महाराष्ट्र शासन यांना रॉयल्टी, क्रॉर्पोरेट कर, डीएमएफ, एनएमईटी या स्वरुपात महसूल मिळणार आहे. त्याचप्रमाणे कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी कृती आराखड्यासाठी रुपये ०.४४ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

सदरहू प्रकल्पात १९ प्रत्यक्ष आणि १०३ अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधि उपलब्ध होणार आहेत. त्याचप्रमाणे अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

सादरीकरण झाल्यानंतर सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण पूर्ण केलेले आहे. तरी उपस्थितांना आवाहन करण्यात येते की प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपल्या ज्या काही सूचना, विचार किंवा आक्षेप पर्यावरणीय संदर्भात असतील, त्या उपस्थित करण्यात याव्यात. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व राहण्याचे ठिकाण सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) <u>श्री रामसिंग गोपाळ राणे, सरपंच, रेडी ग्रामपंचायत, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्गः-</u>**
रेडी गावातर्फे सर्वांचे स्वागत. १९५६ पासून हा खाणकाम व्यवसाय रेडी गावात चालू असून रेडी गावाने कुठल्याही प्रकारच्या प्रकल्पाला विरोध केलेला नाही, नेहमीच सहकार्य केलेले आहे. या कार्यरत खाण व्यवसायासाठी रेडी गावातील सुमारे ३५० ट्रक्स/टिपर्स हे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे वापरण्यात येत असून त्यावर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष काम करणारे रेडी गावातील ग्रामस्थ यांना रोजगार मिळालेला आहे. आमचा खाण व्यवसायास विरोध नाही, पण रेडी गावाचे प्रश्न, गावाला आवश्यक असणा-या सोयीसुविधा या रेडी गावाला मिळाल्याच पाहिजे आणि पर्यावरणचा सर्व नियम पाळले पाहिजे. कंपनीने आमच्या विनंतीला मान देऊन गेले पाच वर्षात आमच्या विनंतीनुसार गावातील घरदुरुस्ती व वैदयकीय आर्थिक सुविधा कंपनीकडून पुरविण्यात आलेल्या आहेत. गावातील पिण्याच्या पाण्याची ३०-३५ लाखांची एचडीपीपी पाईपलाईन आमच्या विनंतीनुसार मुख्य टाकीपासून गावात नेण्याचे काम केलेले आहे. आमचा खाण व्यवसायास विरोध नाही. तसेच रेडी आणि अन्य गावातील लोक प्रत्यक्ष जाऊन भेटल्यानंतर त्याचे प्रश्न सोडविण्यात आलेले आहेत. तसेच रेडी गावातील कला, क्रिडा, आरोग्य याचे प्रश्न असतील, तर त्यास आर्थिक मदत कंपनीने केलेली आहे.

पण त्याबरोबरच गावासाठी आवश्यक असणा-या सोयीसुविधा व गावासाठी आवश्यक असणा-या पर्यावरण संरक्षण, संवर्धनाच्या उपाययोजना या राबविण्यात याव्यात. येथे रेडी गावाचा मुख्य प्रश्न आहे — रोजगाराचा. कारण चालू असणा-या खाण प्रकल्पात १५० कामगार काम करत होते. . त्यातील काही सेवानिवृत्त झाले, काहींनी कंपनी सोडली. तसेच गावात सुशिक्षित

बेरोजगारांचे प्रमाण जास्त आहे. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे रेडी गावातील लोक काम करत होते. तर कंपनीत आता असलेली रिक्त पदे स्थानिक युवक-युवतींना देण्यात यावीत. जमीनदारांना प्राधान्य द्या, त्यास आमचा आक्षेप नाही. कनयाल, तिवरेवाडी, नागोळेवाडी येथील जमिनदार असतील, त्याचप्रमाणे प्रकल्पासाठी जमिन दिलेल्या व्यक्तींना किंवा त्यांच्या वारसांना निश्चितच रोजगारात प्राधान्य देण्यात यावे, मात्र त्याचबरोबर ज्यांच्याजवळ जमिनी नाहीत, त्या रेडी गावातील व परिसरातील महसूल गावातील स्थानिक युवक-युवती आहेत, त्यांना त्यांच्या शैक्षणिक अहर्तेनुसार प्रकल्पात समावेश करण्यात यावा. रेडी गावातील व परिसरातील महसूली गावातील युवक-युवतींना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी. त्या सुशिक्षित बेरोजगारांना त्यांच्या शैक्षणिक अहर्तेनुसार रोजगारात प्रत्यक्षपणे, अप्रत्यक्षपणे सहभाग करुन घेण्यात यावा. येथील तरुणांना रोजगार नसल्याने गोवा येथे जावे लागते. तरी त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात यावी. ती रोजगाराची संधी देताना जे ग्रामपंचायत आणि लोकप्रतिनिधी यांचा विचार घेऊन स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात यावी.

पुढील प्रश्न म्हणजे रेडी गावात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे, तेथे डॉक्टर उपलब्ध आहेत. मात्र शासकीय नियमांनुसार त्यांना घरी जाऊन रुग्णांची, वयोवृध्दांची, संपुर्ण झोपून राहावे लागणा-या (bed ridden) रुग्णांची तपासणी, औषधोपचार करता येत नाही. तरी २४ X ७ संपूर्ण वैदकीय सुविधा पुरविणारे एक अत्याधुनिक हॉस्पिटल कंपनीने रेडी गावात विकसित करावे. कंपनीकडून त्या दवाखान्यात येणा-या रुग्णांना मोफत औषधे उपलब्ध करुन देण्यात यावीत. तरी हे २४ X ७ संपूर्ण वैदकीय सुविधा पुरविणारे एक अत्याधुनिक हॉस्पिटल ५-६ महिन्यात तयार करावे.

कंपनीने आमच्या मागणीनुसार जल शुध्दीकरण प्रकल्प (Water Filtration Plant) उभारला आहे. तरी शासनाच्या नियमानुसार जेती नदीचे पाणी कंपनीने रेडी गावात मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे. दहा लाख लिटर पाणी Water Filtration Plant व्दारे मिळाले असते. खाण चालू झाली की येथेही पाण्याच्या समस्या उद्‌भवतात. त्यातून रेडी गावाला किलारीमार्फत पाणी मिळाल्यास रेडी गावाचा पाण्याचा प्रश्न मिटेल.

या खनिज ब्लॉकच्या बाजूस आमच्या तिवरेवाडीची ग्रामस्थांची घरे, लोकवस्ती आहेत. घराच्या बाजूने रस्ता गेलेला आहे. तरी तेथील लोकवस्तीच्या संरक्षणासाठी तेथे सिमेंट कॉंक्रीटची संरक्षित भिंत (Retaining Wall) कंपनीने बांधून द्यावी. त्यांची घरे सुरक्षित करण्यात यावीत. त्यामुळे तेथील लोकांना कंपनीच्या प्रदूषणाचा त्रास होणार नाही याची काळजी कंपनीने घेणे आवश्यक आहे.

कंपनी प्रशासनाने स्थानिक लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करुन कंपनीने पाईपव्दारे शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. महसुली गावातील अधिकाधिक जमिन ही ओलिताखाली कशी येईल याबाबत योजना तयार करण्यात यावी. भविष्यातील पाणी उपलब्धता व त्यासाठीच्या नियोजनासाठी प्रकल्प परिसरातील ग्रामपंचायती सोबत चर्चा करणे गरजेचे आहे.

कारण आम्हां ग्रामस्थांना कंपनी हवी आहे, त्याचप्रमाणे गावाच्या विकासासाठी योजनासुध्दा हवी, गाव सुरक्षित राखला पाहिजे.

कंपनीने प्रकल्प परिसरातील शाळांसाठी संगणक उपलब्ध करणे, शाळेच्या इमारतीस रंग लावून देणे, स्वयंसेविका पुरविणे अशी मदत केलेली आहे. त्याचप्रमाणे शाळेचे इतर प्रश्न कंपनीने सोडवावेत. पाण्याचा वापर व भविष्यातही पाण्याचा उपयोग होण्यासाठी नियोजन करणे आवश्यक आहे.

जो काही खाण प्रकल्प येथे कार्यरत होणार आहे, तो पूर्ण झाल्यानंतर त्याचे पुर्न:भरण करुन त्या क्षेत्रांवर वृक्षारोपण करण्यात यावे. खाण उद्योग हा कायमस्वरुपी राहत नाही. विशिष्ट

कालावधीनंतर मायनिंग बंद करावे लागते. तर कंपनीने त्यासाठी स्थिर उद्योग, म्हणजे येथील मटेरियल्सचा वापर करुन चालू करावा. म्हणजे मायनिंग बंद झाल्यानंतर तेथील कर्मचारी हे त्या स्थिर उद्योगात समाविष्ट करता येतील व कामगारांचा प्रश्न सुटेल. त्याचप्रमाणे या खाण उद्योगाबरोबरच एक स्थिरस्थावर उद्योग येथे आणावा आणि येथील परिसरातील प्रश्न सोडवण्यात आपण मदत करावी. उद्योगाने येथे अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल. तरी जिल्हा प्रशासनाने इतर उद्योग येथे आणण्यास मदत करावी. त्यामुळे येथील सुशिक्षितांना रोजगार मिळेल.

रेडी गावाचा खनिकर्म निधी हा ब-याच प्रमाणात शासनाकडून रेडी व परिसरातील महसूली गावांना अदा करण्यात आलेला नाही. तरी या बाधित क्षेत्राचा विचार करण्यात येऊन खनिकर्म निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. हा खनिकर्म निधी प्रकल्पाच्या २० कि.मी. पर्यत खर्च करु शकतो. ग्रामस्थांनी केलेल्या प्रयत्नामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी एक रुग्णवाहिका देण्यात आली. मात्र येथील विकासासाठी खनिकर्म निधीची अधिक प्रमाणात गरज आहे. रेडीगावाचा आरोग्यविषयक गरजा व इतर ब-याच सामाजिक कामांसाठी अतिरिक्त खनिकर्म निधीजी गरज आहे.

आमचा प्रकल्पास विरोध नाही. कंपनी प्रशासनानेसुध्दा आमची विनंती टाळली नाही. पण गावातील सोयीसुविधा पुरविताना स्थानिकांनी सूचना केलेल्या सोयीसुविधांना प्राधान्य देण्यात यावे. म्हणजे गणपती मंदिराजवळ शेतीबागायतीसाठी पाईपलाईन, पिण्याचे पाण्याचा प्रश्न, आरोग्य सुविधा, स्थानिक शाळांचे प्रश्न. यासाठी जिल्हा प्रशासनाने कंपनीस सूचना द्याव्यात. प्रकल्पास विरोध नाही, पण स्थानिक लोकांना विश्वासात घेऊन तसेच पर्यावरणाचे सर्व नियम पाळूनच प्रकल्प कार्यान्वित करण्यात यावा ही आमच्या रेडी ग्रामस्थांची मागणी आहे.

**२) प्रितेश शंकर राऊळ, माजी सभापती, सिंधुदुर्ग जिल्हा परिषद:-**

सर्वांचे स्वागत. आता रेडी गावाच्या सरपंचांनी सर्व विषय मांडलेले आहेत, कुठलाही विषय सोडलेला नाही. सरपंचांनी आमच्या समस्या मांडलेल्याच आहेत. प्रकल्पास दुस-या ठिकाणी विरोध होतो, पण रेडी गावाने कुठल्याही प्रकल्पास विरोध केलेला नाही. नेहमीच प्रकल्पांना सहकार्य केलेले आहे. येथील स्थानिकांचा ज्वलंत प्रश्न रोजगार हा आहे. तर येथे कंपनीने जास्तीतजास्त स्थानिकांना रोजगाराची संधि देऊन स्थानिकांना सहकार्य करावे. त्यावर अंकूश हा शासनाने ठेवायचा आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रकल्पास पारित केलेल्या सर्व अटी व शर्ती यांचे तंतोतंत पालन करणे प्रकल्पास बंधनकारक असुन त्यांनी ते पाळलेच पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पर्यावरणाचा -हास होऊ नये याची जबाबदारी कंपनीने घेतलीच पाहिजे.

बैठकीत मागणी केल्यानुसार रेडी गावात कंपनीचे एक क्लिनिक चालू आहे. पण येथील लोकांच्या मागणीनुसार २४ X ७ संपूर्ण वैदकीय सुविधा पुरविणारे एक अत्याधुनिक हॉस्पिटल कंपनीने उभे करणे गरजेचे आहे. कारण येथे एखादी व्यक्ती आकस्मिक आजारी पडली, तर येथे डॉक्टर त्वरित उपलब्ध होत नाहीत. ही येथील शोकांतिका आहे. गेले कित्येक दिवस रेडी गावचे ग्रामस्थ हा प्रश्न मांडत आहेत. कंपनीने जलशुध्दीकरण प्रकल्प विकसित करताना, शालेय साहित्य, शाळांची रंगरंगोटी, आरोग्यविषयक सुविधा याबाबत वेळोवेळी सहकार्य केलेले आहे. ते सहकार्य पुढेही राहणे गरजेचे आहे. जेथे मायनिंग आहे, तेथूनच रस्ता जातो, तरी रस्ता सोडून मायनिंग करण्यास हरकत नाही, मात्र सर्व शासकीय नियम कंपनीने पाळलेच पाहिजेत.

सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे ६० कोटी वार्षिक महसूल हा शासनास प्राप्त होणार आहे. तर केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन यांना जरी निधी मिळत असेल, मात्र रेडी गावाला त्याचा अजून काहीही फायदा झालेला नाही. तो सोडविणे गरजेचे आहे. तरी शासनाने खाण निधीतील काही वाटा

हा रेडी गावासाठी खर्च करणे गरजेचे आहे.  रेडी गावावर खाण निधीबाबत खूपच अन्याय झालेला आहे.

पूर्वी मा. प्रांत अधिकारी यांच्या बरोबर विशिष्ट कालावधीनंतर रेडी गावाचे प्रशासन, खाण कंपनीचे व इतर उद्योगाचे प्रतिनिधी, स्थानिक लोक यांच्याबरोबर बैठका होत, त्या परत सुरु करण्यात याव्यात.  तरी मा. प्रांत अधिकारी यांनी विनंती आहे की कमीतकमी दर तीन महिन्याने संयुक्त बैठक आयोजित करण्यात यावी. त्यामुळे येथील स्थानिक प्रश्न सोडविता येतील.   जसे रेडी गावाने विविध उद्योगांना सहकार्य केलेले आहे, तसेच काही बाबतीत कंपनीनेसुध्दा सहकार्य केलेले आहे.  मात्र कामगारांचा प्रश्न आम्ही कंपनीसमोर सतत मांडत आहोत.  कंपनीच्या प्रदूषणाचा त्रास स्थानिक सहन करतात, कारण येथील लोकांना रोजगार मिळण्याची आशा आहे.   स्थानिकांनी वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार रेडी गावातील कामगार व कर्मचारी जे निवृत्त झाले, त्या रिक्त जागांवर काम करण्यास सक्षम असणारे प्रकल्पग्रस्त व स्थानिक लोक, प्रकल्प परिसरातील महसूली गावांतील व्यक्तींना त्वरित संधी देण्यात यावी.  तसेच रेडी गावातून मिळणारा खनिज निधीतील जास्तीतजास्त वाटा हा रेडी गावातील विकास कामांसाठी उपलब्ध करणे गरजेचे आहे.

तसेच खाण काम झाल्यानंतर जे पुनर्भरण करणे आवश्यक आहे, ते त्वरित करण्यात यावे. कंपनीने  रुग्णवाहिकेची सेवा चांगल्याप्रकारे उपलब्ध करुन दिलेली आहे.  तसेच कंपनीने कंपनीच्या नावाला साजेशे काम भविष्यातही केले पाहिजे.   सिंधुदुर्ग जिल्ह्यात पर्यटन उद्योगास भरपूर वाव आहे, त्यादृष्टीने कंपनी प्रशासनाकडून  नियोजन करण्यात यावे. येथील तरुण-तरुणींना पर्यटन मार्गदर्शन शिबिर, प्रशिक्षण कंपनीतर्फे देण्यात यावे. रेडी गाव व इतर सर्व महसुली गावातील प्रलंबित प्रश्न सोडवावेत. बरेच वर्षे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, त्यासाठी आंदोलने न होण्यासाठी  लवकरात लवकर मार्ग काढावा ही विनंती.  येथील लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत जे विषय मांडतील, त्यावर त्वरित पुढील कार्यवाही होणे गरजेचे आहे.

### ३) नमिता संजय नागोळकर, उपसरपंच, रेडी ग्रामपंचायत,तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्गः-

सर्वांचे स्वागत. या माऊली ब्लॉकच्या जवळ बाधित कनयाळवाडी, व तिवरेवाडी या वस्त्या आहेत. बैठकीत सरपंचांनी हा विषय मांडलाच आहे. तरी त्या बाधित वाड्यांसाठी जिल्हा प्रशासनाने लक्ष घालून त्यांच्या समस्या सोडवाव्यात.  तसेच जे सर्व्हे नंबर आहेत ज्यावर उत्खनन होणार नाही, त्यांना वगळण्यासाठी आम्हाला विशेष सहकार्य करायचे आहे.  जेथे हा खाणीचा ब्लॉक होणार आहे, तेथे वस्ती असून तेथून रस्ता जातो.  त्या वस्त्यांना प्रकल्पाचा त्रास होऊ नये म्हणून  तेथे संरक्षक भिंत (Retaining Wall) बांधून कंपनीने तेथील वस्त्यांचे संरक्षण करावयाचे आहे.   कंपनीने जे सर्व्हे नंबरावर उत्खनन करावयाचे आहे, त्यावरच उत्खनन करण्याचे जिल्हा प्रशासनाने त्यांना आदेश द्यावेत.

तसेच रेडी गावात या प्रकल्पामुळे जरी स्थानिकांची आर्थिक प्रगती झाली, तरी येथे मोबाईल नेटसाठी मोबाईल टॉवर नाही.  जरी कंपनीची सुसज्ज रुग्णवाहिका आहे, पण त्याच्याशी संपर्क साधण्यासाठी मोबाईल जर चालत नसेल, तर काय उपयोग आहे? जर कोणी गंभीर झाले, तर कंपनीजवळ जाण्यासाठी वाहन मिळत नाही, तरी येथे एक मोबाईल टॉवर कंपनीने उपलब्ध करुन द्यावा व संपूर्ण गावाला त्याचा फायदा व्हावा.

कंपनीने परिसरातील संपूर्ण गावांसाठी वर्षातून एकदा आरोग्य शिबिर आयोजित करण्यात यावे.  रेडी गावात प्राथमिक आरोग्य केंद्र आहे.  परंतु त्यास मर्यादा पडतात.  बैठकीत सरपंच आणि उप-सरपंच

यांनी वैदकीय सुविधा उपलब्ध करण्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. तरी गावात एक सुसज्ज हॉस्पिटल २४X७ विकसित करण्यात यावे.

प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर प्रकल्पातील गाड्यांची ये-जा चालू होईल. ट्रक्स येतील, मशिनरी येईल. येथील रस्ते लहान आहेत. त्यामुळे पायी जाणा-या शाळेतील मुलांना अपघात होण्याचा जास्त संभव आहे. त्यांच्या सुरक्षिततेसाठी कंपनीकडून रेडी गावातील मुलांना शाळेची बस (School Bus) उपलब्ध करण्यात यावी. त्यामुळे रेडी गावातील मुले ही शाळेत सुरक्षितपणे जाऊ येऊ शकतील.

कंपनीने रेडी गावाला बरेच सहकार्य केलेले आहे. कंपनीने सुसज्ज रुग्णवाहिका रेडी गावास उपलब्ध केलेली आहे. गोरगरिबांना गरज असल्यास सरपंचांच्या माध्यमातून कंपनीचे सहकार्य लाभत आहे. तरी बैठकीत उपस्थित केलेल्या मागण्यांची पूर्तता करण्यात यावी आणि गावाला सहकार्य करावे.

**४) चित्रा कनयाळकर, माजी सरपंच, रेडी ग्रामपंचायत, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

बैठकीत उपस्थित असलेल्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती, लोकप्रतिनिधी, उपस्थित सर्व नागरीक यांचे स्वागत. रेडी गावात गेले ६०-७० वर्षे मायनिंग व्यवसाय चालू आहे. त्यामुळे रेडी गावाची ओळख ही मायनिंग गाव म्हणूनच झालेली आहे. त्याचप्रमाणे जरी रेडी गावाची प्रगती मायनिंगमुळे झालेली आहे, तरी मायनिंगमुळे होणारे प्रदूषण, त्रास येथील स्थानिक लोक सहन करत आहेत. या कंपनीने येथे सर्व क्षेत्रात म्हणजे शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक बाबींमध्ये सहकार्य केलेले आहे. मात्र आता ज्या सर्व्हे नंबरवर मायनिंग करणार आहात, त्याच्या भोवती लोकवस्ती आहे. तरी त्या वस्तींचा आरोग्य, दळणवळण, शैक्षणिक इ. बाबींवर कंपनीने अगोदरच विचार केलेला असेल, तरी त्याबाबत सविस्तर विचार करुन तेथील लोकांना कंपनीने फायदा करुन द्यावा. कंपनीने काळजी घ्यावी व त्याचा लाभ तेथील वस्त्यांना मिळण्यात यावा.

येथील मुख्य प्रश्न आहे रोजगार. येथे रोजगार उपलब्ध नसल्याने येथील तरुणांना गोव्याला जावे लागते. तरी रोजगाराची संधी येथील स्थानिक युवक-युवतींना देण्यात यावी. सरपंचांनी बैठकीत केलेल्या सूचनेप्रमाणे कंपनीने मायनिंगबरोबरच एक स्थिरस्थावर व्यवसाय विकसित करावा व त्यात रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्यात यावी.

कंपनीचे रेडी गावाच्या बाहेरही अनेक प्रकल्प कार्यान्वित आहेत. कंपनी ही चांगली व्यावसायिक आहे,याची आम्हांला खात्री आहे.

हा ब्लॉक विकसित करताना कंपनीने दहा एकर क्षेत्र सोडलेले आहे. तरी बैठकीत प्रांत अधिकारी यांना नम्रपणे विनंती करते की त्या दहा एकर क्षेत्राच्या ७/१२ वर मायनिंग सोडल्याची कुठेही नोंद नाही. जर ती झाली तर कनयाळवाडीत जाणारा रस्ता आहे, त्या रस्त्याची दुरावस्था झालेली आहे, पावसाळ्यात तेथून जाणे शक्य होत नाही. तरी तो रस्ता त्वरित दुरुस्त करण्यात यावा. मा. प्रांत अधिकारी यांना विनंती करते की बैठकीनंतर त्या रस्त्याची पाहणी करावी.

तसेच महिला सक्षमीकरणासाठी जी पाच लाखांची तरतुद करण्यात आलेली आहे, तर त्याबाबत विनंती करण्यात येते की ती रक्कम वाढून देण्यात यावी.

बैठकीत सरपंचांनी रॉयल्टी संदर्भात आक्षेप नोंदविलेला आहे. जी रॉयल्टी शासनास कंपनीकडून जाते, त्यातील एक भाग जिल्ह्याला मिळतो. मात्र रेडी गावाला त्या रॉयल्टीचा फायदा होत नाही. खूप प्रयत्न केल्यानंतर शासनामार्फत एक रुग्णवाहिका कशीबशी त्या रॉयल्टीतून मिळाली. तरी रेडी गावातून शासनास जी रॉयल्टी मिळते, त्या रॉयल्टीच्या रकमेतील जिल्ह्याला जो

भाग मिळतो, त्यातील ५०% भाग हा रेडी गावाला मिळायला हवा. त्याचा उपयोग गावाच्या विकासकामांसाठी करण्यात येईल. तरी मा. प्रांत अधिकारी यांनी याबाबत लक्ष घालावे ही विनती. तसेच सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे आरोग्यविषयक सुविधा कंपनी विकसित करेल असा आमचा विश्वास आहे. ग्रामपंचायतीतर्फे याबाबत पाठपुरावा करण्यात येईल.

तसेच जर कंपनीस या प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधी देता आली नाही, तर कंपनीचे जे अन्य ठिकाणी प्रकल्प आहेत, तेथे रेडी गावच्या युवकांना प्राधान्याने रोजगाराची संधी देण्यात यावी.

**५) श्री गोपाळ पांडुरंग राऊळ, राहणार- रेडी गाव, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्ग:-**

मी स्थानिक रहिवाशी असून कामगारसुध्दा आहे. मायनिंग व्यवसाय रेडी गावात अनेक वर्षे चालू आहे. मध्यंतरी मायनिंग व्यवसाय बंद पडला, त्यावेळी गावात बरीच बेकारी वाढलेली होती. लोकांना रेडी गावातून बाहेर जावे लागले. त्यानंतर २००३ ला फोमेंतो कंपनीने व्यवसायास सुरवात केली. त्यांनी व्यवसायाबरोबरच स्थानिक परिसराचाही विचार केला. प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे स्थानिक कामगारांना काम दिले. कंपनीस लागणारे सर्व डंपर्स हे येथील स्थानिकांचेच, रेडी ग्रामस्थांचेच आहेत. नंतर कंपनीने पाण्याची सोय केली. नंतर सुसज्ज अशी रुग्णवाहिका रेडी गावासाठी उपलब्ध करुन देण्यात आली. ती पूर्णपणे मोफत आहे. याचा फायदा चांगल्याप्रकारे गावास मिळत आहे. कंपनीतर्फे एक डॉक्टर गावात येऊन तपासणी करतो व औषधे मोफत पुरविली जातात. याचा फायदा गावातील बरेच लोक घेत आहेत.

पर्यावरणाचा विचार केला असता प्रकल्पात जो धुरळा उडतो, त्यासाठी कंपनीत धुळ नियंत्रण संयत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. कंपनीकडून वेळोवेळी रस्त्यांवर पाणी मारले जात असते. तसेच जे डंप बनविले जातात, त्यावर कोट्यावधी खर्च करुन वृक्षारोपण केलेले आहे. शासनाने कंपनीस फाईव्ह स्टार रेटींगने सन्मानित केलेले आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार केल्यास कंपनी गावातील लोकांना मदत करत आहे. त्याबाबत पुरेपूर काळजी घेत आहे. सन्मानाचा विचार केल्यास गावातील लोक त्याचप्रमाणे जर स्थानिक व्यक्ती मग ती लहान किंवा मोठी असो, त्याच्या काही अडचणी घेऊन गेला तर त्यास सन्मानाने वागणूक मिळते. त्याच्या अडचणी ऐकून त्याच्या समस्यांचे निवारण केले जाते. परिसरातील कुठलेही सामाजीक, सांस्कृतीक कार्यक्रम असला तर त्यात कंपनीचे सहभाग असतो. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून कंपनीने बरीच विकासकामे केलेली आहेत.

हा नविन प्रकल्प सुरु झाला, तर गावातील बेरोजगारांना नोक-या मिळण्याची संधी प्राप्त होतील, गावाच्या विकासात भर पडणार आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून कंपनीने परिसरात बरीच विकासकामे केलेली आहेत. तरी माझी विनंती आहे की, सदरहू प्रकल्पास मान्यता देण्यात यावी, त्यामुळे रेडी गाव व परिसराच्या विकासात भर पडेल.

**६) सौ. सायली संतोष पोखरणकर, माजी उपसरपंच, रेडी ग्रामपंचायत, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्ग — सामाजिक कार्यकर्ती -**

गेल्या वेळेस अशाच प्रकारच्या प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी झालेली होती. त्यावेळी बैठकीत काही मुद्दे उपस्थित करण्यात आलेले होते. त्याबाबत अद्यापपावेतो आमचे समाधान करण्यात आलेले नाही. त्यावेळी मा. जिल्हाधिकारीमॅडम यांनी आदेश दिलेले होते की कंपनीने स्थानिकांना कार्यरत खाणीचे प्रत्यक्ष क्षेत्र, खाणीचा संपूर्ण भाग व लोकवस्तीस प्रकल्पाचा काहीही त्रास होणार नाही याची खातरजमा करुन देण्यात यावी. याबाबत कंपनीने कुठलीही माहिती

आमच्यापर्यंत अद्यापपावेतो उपलब्ध केलेली नाही. जनसुनावणी झाल्यानंतर त्यावेळी उपस्थित केलेल्या मुद्दयांचे खंडन करण्यात आलेले नाही.
पर्यावरणाचा विचार केल्यास  रेडी गावातील हवेचे संपूर्ण सर्वेक्षण करण्यात यावे, त्यात किती धुलीकण असतात, किती प्रकारचे आजार निर्माण झालेले आहेत, धुलीकणांमुळे कुठले संभाव्य आजार उत्पन्न होऊ शकतील.

आम्ही प्रकल्पाच्या विरुध्द नाही. तरी गावातील किती युवक युवतींना रोजगाराची संधी देण्यात आली, याची माहिती येथे सांगण्यात यावी.  माझ्या माहितीप्रमाणे कमी प्रमाणात स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात आली.  त्यातील काही कंत्राटी आहेत, इतर सुशिक्षित बेकार फक्त गावात फिरत आहेत.

पर्यावरणीय आक्षेप नोंदविताना सूचना करण्यात येते की, येथील पाण्याचा टीडीएस तपासण्यात यावा. कारण पूर्वी रेडी गावाचे पाणी हे चांगले, स्वच्छ होते. आता ब-याच वेळा ते हिरवे दिसते. नळाला येणारे पाणी हे अक्षरशः हिरवे असते. आता जरी जलशुध्दीकरण प्रकल्प कार्यान्वित केलेला असला तरी ब-याच वेळा रेडी गावातील पाणी हे हिरवे दिसते.  ही समस्या आमची कायमस्वरुपी आहे.

मागच्या जनसुनावणीत कंपनीने आश्वासन दिलेले होते की बंद केलेले हॉस्पिटल लवकरात लवकर चालू करण्यात येईल.  ते अजूनही चालू केलेले नाही.

महिला सबलीकरण करुन गावाचा काय फायदा झाला, महिला सबलीकरण निधी कशाप्रकारे वापरण्यात आला याचे स्पष्टीकरण देण्यात यावे.  कारण कोणाला निधी दिला, तो किती दिला याचे स्पष्टीकरणसुध्दा देण्यात यावे.

प्रकल्प असे प्रतिपादन करतो की जेथे प्रकल्प उभारणार आहेत, तेथे लोकवस्ती असल्यास शासकीय नियमांप्रमाणे लोकवस्ती स्थलांतरीत करण्यात येईल. तरी शासनाने याबाबत लक्ष घालावे, कारण आमचे संपूर्ण आयुष्य येथे गेलेले आहे, त्यामुळे स्थलांतरित होणे आम्हांला शक्य नाही. आमच्या तीन पिढ्या येते राहत आहेत.

तरी लोकवस्तींचे स्थलांतर टाळण्यात यावे, कंपनीने मागच्या बैठकीत आश्वासन दिल्याप्रमाणे प्रकल्पाचे क्षेत्र, बाधित क्षेत्र, लोकवस्ती प्रकल्पापासून किती लांब आहे याबाबतचे स्पष्टीकरण, किती सुशिक्षित  स्थानिकांना  रोजगाराची संधी देण्यात आली, त्यातील किती लोकांना कायमची नोकरी दिली, किती लोकांना कंत्राटी स्वरुपाची नोकरी दिली याची माहिती, त्याचप्रमाणे हॉस्पिटल का सुरु केले नाही आणि  कधी सुरु करणार याची माहिती बैठकीत सांगण्यात यावी. त्याचप्रमाणे कुठल्या सर्व्हे नंबर वर प्रकल्प उभा राहील, कुठल्या सर्व्हे नंबरवर नाही याची संपूर्ण माहिती उपलब्ध करण्यात यावी.  तसेच रेडी गावातील किती सुशिक्षित मुलांना रोजगाराची संधी दिली याबाबत स्पष्टीकरण.

**७) <u>श्री दयानंद कृष्णाजी, राहणार-नागोळेवाडी, मुक्काम पोस्ट-रेडी गाव, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्गः-</u>**

मी अनेक वर्षे  पाठपुरावा केलेला आहे.  माऊली माईन्स जेथून रस्ता करणार आहे, त्याची माहिती तलाठी कार्यालयातून घेतलेली आहे.  प्रकल्पासाठी ज्यांची जमिन घेतली,त्यांना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी. तसेच स्थानिकांना रोजगाराची संधी देण्यात यावी.   तसेच गावातून जो निधी जातो, तो जमिन मालकांचा आहे. तसेच माऊली ते रेडीपर्यंत सर्व जमीनदार आहेत, त्याची अद्यापपावेतो कोणीही दखल घेतलेली नाही.  मा. जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात आलेली होती की ही जमिन घ्या, पण आम्हांला रोजगार द्या.   त्याची दखल घेण्यात आलेली नाही.  तसेच

आम्ही कंपनीस विनंती केली की आमची जमिन घ्यावी व आम्हांला मोबदला देण्यात यावा. ती जमिन कंपनीने घेतली नाही. तरी कंपनीने ती जमिन घेऊन आम्हांला आमचा मोबदला द्यावा. येथील खाणीतून मिळणारा निधी हा येथील गावांमधून मिळालेला आहे, त्याचा फायदा शासन, प्रशासन आणि इतर लोकांनाच झाला,आम्हांला झालेला नाही. आम्ही शासनास, म.प्र.नि. मंडळास पत्र पाठविले, त्याचे उत्तर आलेले नाही. नंतर आम्ही मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांना पाठविले, तर त्याचे उत्तर आलेले आहे, त्याची प्रत सादर करण्यात आलेली आहे. तरी तो निधी रेडी गावाच्या विकासासाठी खर्च करण्यात यावा ही विनंती.

तसेच आमचा पाण्याचाही प्रश्न मिटलेला नाही. कंपनी प्रशासन सांगतात की दिवसाला पन्नास हजार पाण्यासाठी खर्च करतो. आम्ही शुध्द पाणी पुरवितो. जर शुध्द पाणी पुरवतात, तर त्याचा अहवाल स्थानिकांना देणे आवश्यक आहे. तसेच हे शुध्द पाणी आपण मोफत देतात की बील भरुन देतात हे आम्हांला कळलेच पाहिजे. म्हणजे आमची दिशाभूल करण्यात येते. तसेच आम्ही कंपनीकडे मागणी केली की घरोघरी जाऊन तेथे दुषित पाणी येते का याबाबत पाहणी करण्यास सांगितले, मगच माहिती मिळेल. दुसरा विषय आमची जमिन गेली, तर आमच्या मुलाला नोकरीला लावा. तर याबाबतही पुढील कार्यवाही होत नाही.

**८) श्री पराग शिरोडकर, राहणार-रेडी गाव, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

मी कनयाळ येथे राहतो. ब्लॉकच्या बाजूनेच जो मुख्य रस्ता गेलेला आहे, तो गावाला जोडतो, त्या रस्त्यावर कोणतेही वाहन चालविण्याचा राहिलेला नाही. तो पुढे समुद्राला जातो. तो दुरुस्त करण्यासाठी आम्ही ब-याच वेळेस ग्रामपंचायतीस, कंपनीला निवेदन दिलेले आहे. तर जे प्रशासनाच्या हातात आहे, त्यातही लक्ष घालण्यात यावे. कारण पुढील बाब म्हणजे कनयाळच्या व इतर गावातील लोकांना मायनिंगमधून जावे लागते. शासनाने त्याबाबत लक्ष घालावे. तेथील लोकांना मायनिंगमधूनच जाण्याशिवाय पर्याय नाही. ही माझी मागणी आहे.

बैठकीत सरपंच, उपसरपंच यांनी बरेच मुद्दे मांडलेले आहेत. त्याबद्दल कंपनीने लक्ष घालावे. मायनिंग ही गोष्ट रेडीगावासाठी नविन नाही. आमच्या जन्माअगोदरपासून येथे मायनिंग आहे. मायनिंग आणि पर्यावरण हे दोन्ही विरोधी आहे. तरीही पर्यावरण सांभाळून मायनिंग चालले पाहिजे. येथे मायनिंगशिवाय दुसरा कुठलाही व्यवसाय नाही. त्यामुळे मायनिंगमुळे होणारे प्रदूषण हे आम्हांला सहन करावे लागेल. तसेच ग्रामस्थांनी मागणी करुन प्रदूषण नियंत्रणात सुधारणा करुन घेतली पाहिजे. मात्र कंपनीचा त्रास रेडीवासी करत आहेत, कारण त्यांना आशा आहे की कंपनीत रोजगार मिळेल. कंपनी प्रशासनाशी वेळोवेळी याबाबत चर्चा करण्यात आलेली आहे. कंपनी प्रशासन सांगते जे स्थानिक आहेत, त्यांनाच रोजगाराची संधी देण्यात येईल. पण जे स्थानिक आहेत, त्यांच्या जमिनी प्रकल्पात गेलेल्या नाहीत, त्यांनाही रोजगाराची संधी देण्यात यावी. ज्या जमिनदाराची प्रकल्पात जमिन गेली, पण त्याला रोजगाराची गरज नाही, तर अशावेळी कंपनीने त्याने शिफारस केलेल्या व्यक्तीस रोजगाराची संधीही देण्यात यावी. उर्वरित मुद्दे उपस्थितांनी सांगितलेले आहे.

माझा प्रकल्पास पूर्णपणे पाठिंबा आहे.

**९) श्री सागर नामदेव राऊत, राहणार-रेडी गाव, तालुका-वेंगुर्ले, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

कंपनी स्थापन करण्यापासून आम्ही पाहत आहोत. कंपनी २००४ पासून कार्यरत झाल्यापासून कंपनीकडुन रेडी गावात व प्रकल्प परिसरात शैक्षणिक व आरोग्याबाबत सुविधा

पुरविण्यात आलेल्या आहेत. कुठलाही प्रकल्प आला, तर त्याचे सकारात्मक परिणामांबरोबरच नकारात्मक परिणाम होत असतात. मात्र या कंपनीने ब-याच सामाजिक कामात मदत केलेली आहे.

तसेच आता सरपंच यांनी कंपनीकडून काही गोष्टींची मागणी केलेली आहे. तर कंपनी त्याबाबत निरसन करतील. कंपनी जे डंपर्स वापरत आहे, त्यात स्थानिकांचेही डंपर्स आहेत. कंपनीमुळे येथे अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ झालेली असून येथील लोकांनी गॅरेजेस् सुरु केलेली आहेत. कंपनी ही हॉटेल व्यवसायातसुध्दा आहे, तर कंपनीने येथील परिसरात हॉटेल व्यवसायात रोजगार निर्मितीच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

**१०) श्री सुदेश कांबळी, राहणार-रेडी गाव, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

बैठकीत असे मत मांडण्यात आले की रेडी हे मायनिंग क्षेत्र असून मायनिंगशिवाय रेडीला पर्याय नाही. मात्र सिंधुदुर्ग जिल्हा हा महाराष्ट्र शासनाने पर्यटन क्षेत्र म्हणून घोषित केलेला आहे. त्याचप्रमाणे रेडी हे गावही पर्यटन क्षेत्र आहे. तरी कंपनीने येथे पर्यटन व्यवसाय विकसित करावा. त्यामुळे येथील स्थानिक युवक-युवतींना रोजगार मिळेल. कारण रोजगार नसल्याने येथील युवकांना गोव्यास जावे लागते. ही कंपनी जमिन व्यवहार करताना व इतर कामे करताना ती दलालांमार्फत करते. तरी कंपनीने प्रत्यक्ष स्थानिक जमीनदारांबरोबर चर्चा करावी. दलालांना मध्ये टाकू नये.

कंपनीकडुन प्रत्येक वर्षी आढावा बैठक आयोजित करण्यात यावी. त्यात कंपनीने काम कोठे करणार, किती काम झाले व भविष्यात कामात किती गुंतवणूक होणार, कुठे घेणार याबाबत माहिती जनतेस देण्यात यावी.

तसेच कंपनीने प्रत्येक गावागावात पाणी पोचविण्याचे काम करावे. कारण मायनिंगमुळे काहींची जमिन ही उध्वस्त झालेली आहे. तेथे काजूच्या बागा, आंबा कलमे, फणसाच्या बागा आहेत. तरी तळागाळाच्या लोकांना पाणी सोडण्याचे काम कंपनीने करावे. त्याचप्रमाणे या कंपनीस ज्या क्षेत्रात काम करावयाचे आहे, तेथील जमिनदारांना न्याय द्यावा. जमिनदार कुटुंबातील एकतरी व्यक्ती कंपनीत सामावून घ्यावी.

**११) श्री राजेन्द्र कांबळी, राहणार-रेडी गाव, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

कंपनी बंद होऊन कामगारांची उपासमार होऊ नये आणि आमचा ट्रक व्यवसाय बंद होऊ नये म्हणून मी काही सूचना करणार आहे —

अ) ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. जर पर्यावरणाचे निकष पाळायचे, तर १००% ही मायनिंग कंपनी चालूच शकणार नाही. गेले ६० वर्षांपासून आमचे गाव या मायनिंगला परवानगी देत आहे. कारण मायनिंग व पर्यावरण यांचा ताळमेळ कधीही बसणार नाही. आम्हांला गाव उध्वस्त करायचा नाही, पण मायनिंग पाहिजे. तरी त्यासाठी कंपनीने दूरगामी उपाययोजना कराव्यात. सादरीकरणात शाश्वत योजना दर्शविण्यात आल्या. पण शाश्वत योजना म्हणजे काय, तर शाश्वत योजना म्हणजे या मायनिंग किंवा अन्य उद्योगांमुळे पुढील ५० वर्षे पर्यावरण संतुलन राखून येथील गावाचा विकास कसा होईल आणि असेल व त्याचा सामान्य माणसांना, सर्व समाजास फायदा कसा होईल याचे नियोजन.

ब) या कंपनीवर आमचा विश्वास आहे, म्हणून हीच कंपनी आम्हांला हवी आहे. त्याचप्रमाणे गावातून कंपनी जाणे हे गावाला परवडणारे नाही. कारण आर्थिक विकास हा कंपन्यामुळेच होतो. मात्र जेथे ही पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी चालू आहे, त्याच्या सर्व बाजूने मायनिंग आहे. मग येथील रहिवाशांनी कुठे फिरायचे? कनयाळ गावात जाताना मायनिंगच्या खड्ड्यांमधून जावे लागते. या कंपनीकडे तांत्रिक मनुष्यबळ आहे. कंपनीची आर्थिक स्थिती चांगली आहे. तरी या कंपनीने स्पॉज आयर्न प्रकल्प, पीग आयर्न कंपन्या चालू कराव्यात. उत्पादनाची किंमत (Production Cost) ही ५०% मायनिंगच्या उत्पादन खर्चाएवढी असेल. प्रकल्प व्यवस्थापनाकडे रेडी गावची जमिन आहे, रेडी गावाचे पाणी आहे. त्यामुळे प्रकल्प व्यवस्थापनाने जर स्पॉज आयर्न प्रकल्प, स्टील आयर्न प्रकल्प येथे सुरु केल्यास तो कायमस्वरुपी चालू शकतो, खाणकाम उद्योगास मर्यादा आहेत काही वर्षांनी खाण उद्योग हा बंद करावाच लागतो. स्पॉज आयर्न प्रकल्प, स्टील आयर्न प्रकल्पामुळे येथील स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधी कायमची मिळू शकते.

क) या खाणकाम प्रकल्पामुळे रेडी गावातील ३०% क्षेत्र हे खड्ड्यात गेलेले आहे. तरी रेडी गावात बॅक फिलींग (Back Filling) करणे गरजेचे आहे. बॅक फिलिंग झाल्यास रेडी गावात परत शेकडो एकर जमिन विकासासाठी उपलब्ध होईल. रेडी गावाचा विकाससुध्दा याच कंपनीस द्यावा. या माऊली लोह खनिज ब्लॉकलाच गावातील बॅक फिलींगचे (Back Filling) काम देण्यात यावे ही विनंती. कारण या कंपनीवर भरोसा आहे. तरी कंपनी प्रशासनाने स्पॉज आयर्न प्रकल्प, स्टील आयर्न प्रकल्प सुरु करण्यात विशेष रस घ्यावा ही विनंती. त्यामुळे स्थानिकांना रोजगाराची संधी मिळेल. येथील बरेच तरुण-तरुणी हे सुशिक्षित, सर्व संवर्गात प्रशिक्षण मिळालेले आहेत. मायनिंग प्रकल्प हा काही दिवसांनी बंद करावाच लागतो. रेडी गावास सिंधुदुर्ग जिल्ह्याची आर्थिक राजधानी म्हटले जाते. ज्या गावाने शासनास कित्येक करोड रुपयांचा महसूल दिला, त्या रेडी गावातील युवक-युवतींना मात्र नोकरीसाठी गोव्याला जावे लागते.

ड) पण या मायनिंगमुळे सर्व रेडी गाव उध्वस्त झालेले आहे. आता पर्यावरणाचा -हास बघायचा असेल, तर रेडी गाव बघा असे लोक आता म्हणू लागलेले आहेत. तरी ही ओळख पुसायची आहे आणि त्यासाठी ते काम या माऊली आयर्न कंपनीने करावे.

इ) मी लेखी सूचना केलेल्या आहेत. रेडी गावातील समस्यांसाठी कंपनीच्या व्यवस्थापनास तोंड द्यावे लागते. खाणीमुळे सर्व रेडी गाव उध्वस्त झालेले आहे. तर ज्या मायनिंग कंपन्या येथे आल्या व त्यांचा फायदा घेऊन काम सोडून, पर्यावरणाचा -हास करुन गेल्या, त्या किती कंपन्यांच्या विरुध्द आतापावेतो जिल्हाधिकारी यांनी कारवाई केलेली आहे? तर एकाही नाही. तरी त्या संबंधित कंपन्यांना बोलावून त्यांच्याकडून मायनिंग बुजविण्याचे काम करुन घ्या. रेडी गावातील मायनिंग खड्डे बुजविण्याचे आदेश दिल्यास, तर दहा वर्षाचे काम ट्रक बांधवांना मिळेल, रेडी गावात शेकडो एकर जमिन विकासासाठी उपलब्ध होईल. त्यासाठी लागणारा निधी जिल्हाधिकारी कार्यालय उपलब्ध करु शकते. तरी सर्व गावक-यांकडून ही विनंती आहे.

ई) मायनिंगमुळे एवढे डस्ट प्रदूषण होते की समोरचे दिसत नाही. गावातील लहान मुले व वृध्द माणसे सारखी आजारी पडतात. त्यामुळे कंपनीने धुळ नियंत्रण सयंत्रणा प्रकल्पात ताबडतोब कार्यान्वित करण्यात यावी. मायनिंग करत असताना रेवतीनगर हे आमचे मूळ गाव आहे. तेथील गणपती मंदिर हे देशात प्रसिध्द आहे, मात्र तेथील रस्ता चांगला करण्यास कोणीही तयार नाही.

पुढील मुद्दा – खाणीमुळे खड्डे झालेली सर्व जमिन जर बॅक फिलिंग केली तर शेकडो एकर जमिन मिळेल, नंतर येथे कंपनीने पर्यटन विकसित करण्यात यावे. आम्ही रेवतीनगर बचाव समिती स्थापन करणार आहोत. कारण येथील पर्यावरण वाचविले, तर आम्ही राहू. तरी लवकरात लवकर बॅक फिलिंग करुन पर्यटन सुरु करण्यात यावे. सर्व जगाला/लोकांना कळेल की रेडी गावाने कसे मायनिंग बंद करुन पर्यावरण संरक्षण आणि पर्यटन विकास केलेला आहे, त्यामुळे स्थानिक तरुण-तरुणींना एक नविन रोजगाराचे क्षेत्र मिळेल. पर्यावरण संवर्धनासाठी रेडी गावाचा आदर्श इतरांनी घ्यावा असे काम होईल. तसेच रेडी गावातील परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात मोठ्या प्रमाणात वाढ होईल.

तरी मी केलेल्या सूचनांचे पालन करावे ही विनंती.

१२) **श्री दत्तात्रय कामत, राहणार-महादेववाडी, रेडी गाव, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

मला २-३ मुद्द्यांवर कंपनीकडून व शासनाकडून स्पष्टीकरण हवे आहे –

**सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्र (CRZ – Coastal Regulation Zone)** - कंपनीचे ५०० मीटर्स रुंदीचे अंतर हे वगळलेले आहे. जी जागा वगळली, ती जागा पूर्वी न्यु इंडिया माईन्सकडे होती, ती लीज ३४ हेक्टरची होती. कारण सदरहू प्रकल्प हा २४.२६ हेक्टरमध्ये आहे. तर उरलेल्या दहा हेक्टर जमिनीची सद्यस्थिती कशी आहे, त्यात खड्डे आहेत वा जमिन लागवड केलेली आहे, याचा उल्लेख पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नाही. तरी त्या उरलेल्या जागेबाबत भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांचे काय नियोजन आहे? सीआरझेड पासून हद्दीपर्यंत (boundary) त्या जागेचे मार्कींग केलेले आहे काय? याबाबत कंपनीने आणि शासनाकडून स्पष्टीकरण देण्यात यावे.

दुसरी गोष्ट मायनिंगची खोली ही ईआयए अहवालात समुद्रसपाटीपासून ३० मीटर खोली आहे असे सांगितलेले आहे. जर समुद्र ५०० मीटर अंतरावर आहे, तर समुद्राचे पाणी हे ३० मीटर उंचीवर आहे. म्हणजे खाणीमध्ये आलेले पाणी हे झिरपून गावांमध्ये येणार. पाण्याची पातळी कमी झाली की पाणी कमी होणार, त्यामुळे गावांतील पाण्याचे स्त्रोत हे खारे होणार, ते टाळण्यासाठी कंपनीने केलेल्या प्रस्तावित उपाययोजनांची माहिती व स्पष्टीकरण.

प्रस्तावित खाण प्रकल्प हा २४.२६ हेक्टरमध्ये आहे. तर खाणीत किती खोल खाणकाम करणार आहात? त्याचा परिसरातील गावांवर काय परिणाम होईल? कारण वस्तीच्यामध्ये ३० मीटर खोली खाणीचा व्यवसाय चालणार आहे. याचा उल्लेख पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवालात नाही. त्यामुळे गावक-यांना असे वाटते कंपनी ही भूगर्भापर्यंत खाणकाम करणार आहेत, त्यामुळे समुद्राचे पाणी गावातील जलस्त्रोत मिसळल्यानंतर याचा परिणाम हा येथील वारंवार होईल. डोंगरावरसुध्दा खाणकाम करण्यात आलेले आहे. त्यामुळे डोंगराचे गावाला जे पाठबळ (Support) होते, ते नष्ट झालेले आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या भोवताली वस्ती असून वस्तीच्या मध्ये खाण व्यवसाय चालतो. गेले ६० वर्षे हा व्यवसाय चालू आहे असे येथे सर्व उपस्थितांनी सांगितले. त्यामुळे आजूबाजूच्या वस्त्यांना धोका, याबाबत स्पष्टीकरण. किती अंतरापर्यंत खाणकाम करण्याची परवानगी आहे याचे शासनाने स्पष्टीकरण द्यावे.

त्याचप्रमाणे परिसरात बंद खाणी आहेत. तर स.नं. १३८ – हुडावाडी आणि स.न. २३४ – बोंम्बडोजीचीवाडी आणि नागोळेवाडीचा संबंध येतो – या खाणी ४० वर्षे आणि दुसरी १२-१३ वर्षे बंद आहेत. त्यातील एक खाण ही आता सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्र (CRZ – Coastal

Regulation Zone) त्यात येते. तर सीआरझेड क्षेत्रातील खाणीस पुनर्भरणाची अनुमती आहे काय? याबाबत म.प्र.नि. मंडळ आणि शासनाने स्पष्टीकरण द्यावे.

पूर्वीच्या काही खाणकाम मालकांनी खाणकाम केलेली टाकाऊ माती (Rejection) अरबी समुद्रात टाकलेली (Dump) आहे. त्यामुळे जवळजवळ कनयाळ आणि तिवरेवाडी यांच्या सीमेवर ३०० हेक्टर भूभाग तयार झालेला आहे. त्यावेळच्या जिल्हाधिकारीमॅडम यांनी आदेश काढून ते बंद केले. त्यानंतर ती जागा शासनाने आपल्या ताब्यात घेऊन त्यावर वनीकरण केले. तो वनविभाग म्हणून घोषित केला. ही जमिन समुद्रामध्ये निर्माण झाल्याने त्यामुळे सीआरझेडचा नकाशा बदलला गेला. त्यामुळे तिवरेवाडी व समुद्र यात ३०० हेक्टर रुंदीचा भूभाग तयार झाला. त्यामुळे तिवरेवाडी व समुद्र याच्यामध्ये ३०० मीटर रुंदीचा भाग झाला आणि भरतीची लाईन ही मागे गेली. त्यामुळे ३०० मीटर समुद्र हा मागे गेलेला आहे. सीआरझेडची लाईन ही तेवढी मागे गेली. तरी माझी मागणी आहे की ही ३०० मीटर भरतीची लाईन मागे गेलेली आहे, याठिकाणी पुनः सर्वेक्षण करण्यात यावे आणि नंतर सीआरझेडची लाईन ही घोषित करण्यात यावी व नंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी. याबाबत कंपनी व शासन यांनी स्पष्टीकरण द्यावे ही विनंती.

**१३) <u>श्री दत्तगुरु भगत, राहणार-रेडी कनयाळ गाव, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्गः-</u>**

रेडी गावाची लोकसंख्या ही सुमारे ७,५०० आहे. येथे मायनिंग व्यतिरिक्त दुसरा कुठलाही उद्योग नाही. दुसरे उद्योग चालतात म्हणजे रेडी बंदर, जे मायनिंगवरच अवलंबून आहे. माझी शासनास विनंती आहे की रेडी गावात मायनिंग चालणे अत्यंत गरजेचे आहे. मी वीस वर्षात मायनिंगबाबत बराच अभ्यास केलेला आहे. कंपनीने रेडी गावात शैक्षणिक, आरोग्य, बागायती शेतीबाबत सहकार्य केलेले आहे. पर्यावरणाच्या दृष्टीनेही काम केलेले असून मंदिरांनाही मदत केलेली आहे. कंपनीने जलशुध्दीकरण प्रकल्प उभारलेला आहे. ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न हे जवळपास २५ लाख असेल. तर रेडी गावाला पाणी हे रोज अकरा हजार लिटर लागते. तर पंपिंग करुन गावात पाणी पुरविण्यासाठी साठ लाख रूपये खर्च येतो. कंपनीमुळेच ती योजना कार्यान्वित करण्यात यश आलेले असून प्रत्येकाच्या घरात पाणी पोचलेले आहे. आता गावामध्ये अप्रत्यक्षपणे सुमारे अठरा कोटी रुपयांचा विनिमय होत आहे. हा आर्थिक सबलीकरणासाठी महत्वाचा मुद्दा आहे.

नविन माऊली माईन्स ही ९६% उत्पन्न शासनास देऊन फक्त ४% मध्ये चालू करणार आहेत. तरी माझी कंपनीस विनंती आहे की त्या ४% मध्ये सुध्दा माझी विनंती आहे की स्थानिक लोकांच्या गरजेनुसारच गावांतील विकास कामे हाती घेऊन जास्तीतजास्त स्थानिकांना प्रकल्पात रोजगाराची संधी देण्यात यावी, त्यामुळे रेडी गाव हा समृध्द होऊ शकतो. ही कंपनी गेले वीस वर्षे व्यवस्थित चालू आहे. ब-याच लोकांना या कंपनीचा फायदा झालेला आहे. ३५० पेक्षा जास्त टीपर्स गावात आहेत. २००३ साली कंपनी चालू झाली, तेव्हा स्थानिक टिपर्सची संख्या ही १४६ होती. आता २०२३ साली टिपर्सची संख्या ही जवळजवळ ३५० पर्यत पोहचलेली आहे. ब-याच लोकांनी व्हील लोडरसुध्दा घेतलेले आहेत. याचा अर्थ येथे

ब-याच प्रमाणात स्थानिकांना रोजगार आणि व्यवसाय मिळालेला आहे.

सर्वात महत्वाचे म्हणेज गावासाठी चांगल्या प्रकारे रुग्णवाहिका कंपनीने उपलब्ध करुन दिलेली आहे. गावात दोन रुग्ण होते, त्यांची आर्थिक स्थिती बिकट होती. त्यांना डायलिसीस करावे लागत असे. तर त्या रुग्णांना कंपनीच्या रुग्णवाहिकेची सेवा ही पाच वर्षे मिळालेली आहे. ते

दोन्ही रुग्ण आठवड्यातून एकदा-दोनदा बांभोळी, सावंतवाडी, कुडाळला जात असत. त्यामुळे ते रुग्ण जवळपास पाच वर्षे चांगले राहू शकले. ही येथील महत्वाची गोष्ट आहे.

आता माझी कंपनीला विनंती आहे की बैठकीत सरपंच, उपसरंपच व येथील स्थानिक नागरिकांना कंपनीस ब-याच गोष्टी सूचविलेल्या आहेत. तरी त्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात यावा आणि या प्रकल्पाचा रेडी गावास जास्तीत जास्त कसा फायदा होईल, याबाबत नियोजन करण्यात यावे.

१४) **श्री संतोष व्यंकटेश नाईक, राहणार-रेडीगाव, तालुका-वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

मी रेडी गावाचा नागरिक म्हणून माझे मत मांडत आहे. आम्ही उपस्थित केलेले मुद्दयांना येथे उत्तरे मिळणार आहेत की नाहीत याबाबत सांगावे म्हणजे पुढील सूचना मांडण्यात येईल. काही संयुक्तिक उत्तरे असतील, तर ती मिळणार आहेत काय? मी कंपनीचा विरोधक नाही. या कंपनीचे व मायनिंगचे एवढे समिकरण जुळलेले आहे की मी या मायनिंगसाठी तिस-या पिढीचा प्रतिनिधी आहे. पण पुढच्या पिढीच्यादृष्टीने मला काही गोष्टी सांगायच्या आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की प्रकल्प प्रवर्तक उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत संयुक्तिक उत्तरे शेवटी देतील.

मी मायनिंगला विरोध करणार नाही, मायनिंग चांगलेच काम करत आहे. स्थानिकांनाही व्यवसाय हवाच आहे. जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा याची गरज आहे. जे विस्थापित झाले, त्यांना रोजगाराची संधी देण्यात येते. मात्र असेही स्थानिक तरुण आहेत की त्यांच्याजवळ जमिन नाही. त्यांच्यासाठी कंपनीने रोजगाराची संधी उपलब्ध करण्यात यावी, किमान १०% रोजगार राखून ठेवण्यात यावेत.

मी शाळेत शिक्षक आहे. कंपनी गेले ३-४ वर्षे शाळांना गणवेश पुरवित आहे. आणि मुले देतात म्हणून गणवेश वापरतात. गेले २-३ वर्षे शिक्षकांची भरतीच केली नाही तरी आता शाळेत स्वंयसेवकांची नेमणूक करावयाची आहे, ते अनुदान वर्ग करण्यात यावेत. गणवेश, दप्तर पालक मुलांना देतात. तशी नोंद घेण्यात यावी. सीएसआर निधीतील रक्कम अशासाठी वापरण्यात यावी.

जगण्यासाठी निवारा आवश्यक आहे. शासनाच्या योजनेत सर्वांचाच फायदा होतो असे नाही. समाजातील बरेच लोक हे जरी दारिद्रय रेषेखालील नसतात, पण त्यांना निवारा नसतो. तर काहींना घर नसते किंवा ते अगदी झोपडीतच राहतात. तरी कंपनीने सीएसआर निधीतून त्यांच्यासाठी एक आवासीय कॉलनी बांधावी. तसेच आरोग्य शिबिरे हे वेळोवेळी आयोजित करण्यात येतात. त्याचा सर्वांनाच फायदा होतो असे नाही. तसेच आरोग्याबाबत कंपनीने प्रत्यक्ष खर्च न करता सरकारी किंवा खाजगी कंपनीची मेडिक्लेम पॉलिसी ही स्थानिकांना द्यावी. त्या मेडिक्लेम कंपनीची एखादी शाखा रेडी गावात आणण्याचा प्रयत्न करण्यात यावा. कारण शासनाच्या अनेक योजना आहेत व त्यांचा योग्य उपयोग रेडी ग्रामस्थांना होत नाही. कंपनीसुध्दा आरोग्याबाबत मदत करते. मात्र ते अत्यंत जुजबी आहे.

आता पाण्याबाबत — तर कंपनीने एक फिल्ट्रेशन प्लॅन्ट बांधलेला आहे. मात्र माझ्या घराजवळील भागात २५०-४५० टीडीएस असलेले पाणी मिळते. तर ते पाण्याची पाईपलाईन खराब असल्याने शुध्द केलेले पाणी मिळेपर्यंत अशुध्द होते. तरी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन ही त्वरित बदलावी. मी स्वतः आर.ओ. घरी बसविलेला असून २५० च्या खाली टीडीएस मिळत नाही. तसेच पिण्याचे पाणी मानकांमध्ये शेवटच्या उपभोक्त्यापर्यंत जाण्यासाठी कंपनी, ग्रामपंचायत व

लोकप्रतिनिधी यांना आपसात समन्वय ठेवावा. कारण येथे करोडा रुपये खर्च करुनही ते पाणी आमच्यापर्यंत जात नाही. कंपनीकडून जे पाणी वितरित होते, त्यात अनियमता आहे, काही ठिकाणी पाणी सर्वांना मिळत नाही, काही ठिकाणी बागा ओस पडलेल्या आहेत. बरेचसे पाणी हे शेवटी खाडीला, समुद्राला जाते, ते वळवून जेथे गरज आहे तेथ उपलब्ध करण्यात यावे.

कंपनी सामाजिक कार्यासाठी खर्च करते. शिक्षण, आरोग्य त्याचबरोबर रेडी गावातील निराधार लोकांसाठी वृध्दाश्रम विकसित करण्यात यावेत. वृध्दाश्रमासारखी एखादी सामाईक योजना तयार करण्यात यावी. कंपनी तसे करणार असेल, तर मी माझी जमीन विनामुल्य देण्यास तयार आहे.

प्रकल्पात काही कंत्राटदारांना वारंवार कामे दिली जातात. तरी कोणाचीही मक्तेदारी करु नये, स्थानिक कंत्राटदारालाही संधी देण्यात यावी.

कंपनीच्या अनेक इतर कंपन्या (sisters companies)आहेत. या फोमेंतो कंपनीच्या ३०-४० सिस्टर्स कंपन्या असतील. सर्वांनांच रेडी प्रकल्पात नोकरी देणे शक्य नाही, तर येथील पात्र उमेदवारांना दुस-या ठिकाणच्या सिस्टर्स कंपन्यामध्येही रोजगाराची संधी देण्यात यावी. कौशल्य असलेल्या स्थानिक व्यक्तींना रोजगाराची संधी देण्यात यावी. तसेच स्थानिकांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण हे वेळोवेळी आयोजित करण्यात यावे. प्रकल्पात स्थानिक काम करु शकतील, एवढे त्यांना सक्षम करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.

कंपनीत कार्यरत कामगार, कर्मचारी याचा मृत्यू झाल्यास अनुकंपा तत्वावर त्याच्या/तिच्या वारसदारास कंपनीच्या सेवेत सामाऊन घ्यावे. तसेच कंपनीच्या कामगार/कर्मचा-यांप्रमाणे गावातील लोकांचाही गटविमा योजना काढून देण्यात यावी.

इंचभर जमिन जरी सरकारी योजनेसाठी दिली, तर त्यांना प्रकल्पग्रस्त समजले जाते. त्यांना शासन सेवेत प्रकल्पग्रस्त संवर्गातून बहुतांशः रोजगार मिळू शकतो. तरी आमची जमीन घेतली तर आम्ही प्रकल्पग्रस्त कसे होऊ याबाबत स्थानिकांना मार्गदर्शन करण्यात यावे. आम्हांला कंपनीला विरोध करायचा नाही.

कंपनी विविध सामाजिक योजना राबवित असते. त्याचा स्थानिकांना फायदा होण्यासाठी कंपनी जनसंपर्क अधिकारी नेमतात. तसेच या कंपनीने व्हिलेज जनसंपर्क अधिकारी नेमावा.

सीएसआर निधी कुठे कुठे खर्च करण्यात आला, त्याचा वार्षिक अहवाल हा स्थानिकांना, गावांना उपलब्ध करुन देण्यात यावा. कंपनीने भाड्याने जमिन/भूखंड घ्यावा.कंपनीने भविष्याचा विचार करुन खाणकाम बंद करताना पुनर्भरण योजना राबविण्यासाठी निधीची तरतुद करुन ठेवावी. कंपनीने ९६% तरतुद केलेली आहे, त्याबद्दल अभिनंदन.

ज्यादिवशी कंपनी बंद होईल, त्या दिवशी आम्हांला या गावातून विस्थापित व्हावे लागणार आहे. तरी कंपनीने व शासनाने पुनर्वसन योजना शासनाने व कंपनीने आजपासूनच तयार करावी.

कंपनीने रेडी ग्रामस्थांना मोफत पाणी पुरवठा करावा ही माफक अपेक्षा आहे. भविष्यात कंपनी नसली तरी पुढील पिढ्यांसाठी पाण्याची उपलब्धतेच्या दृष्टीने नियोजन करण्यात यावे.

कंपनीने खाण बंद झाल्यानंतर पुनर्वसनाची तरतूद करुन ठेवावी, त्यासाठी निधीची तरतुद करुन ठेवावी.

कंपनीने गावात एक आदर्श शिक्षण संकूल उभारावे, जे जिल्हा परिषदेच्या जमिनीतच उभारावे. गावातील सर्व लोकांना उपयोगी पडेल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आपल्या सूचना, आक्षेप हे मुद्देसुद व थोडक्यात मांडण्याचे व प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयी मांडण्याचे सूचना केली.

१५) **श्री निलेश बाळकृष्ण रेडकर, राहणार-रेडी गाव, तालुका- वेंगुर्ला, जिल्हा-सिंधुदुर्ग:-**

मायनिग झालेच पाहिजे, त्याला पर्याय नाही असे येथे म्हटले गेले. ते १००% सत्य आहे. त्यामुळे मायनिंग हे चालू राहिलेच पाहिजे. तसेच रेडी परिसरातील शेती, फळबागा, मासेमारी ही साठ वर्षात नष्ट झालेली आहे. येथे काही मान्यवरांनी मायनिंग संपल्यानंतर गाव विस्तापित करावे लागेल असे मत मांडले. रेडी गावातील व परिसरातील सुशिक्षित तरुण नोकरीसाठी गोव्याला जातात किंवा येथे ट्रक व्यवसाय करतात. कारण मायनिंगशिवाय पर्याय नाही. पण येथे मुद्दा उपस्थित होतो की तो मुलगा हफ्ता भरु शकतो का? तरीही मायनिंगशिवाय पर्याय नाही.

मागच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीच्या वेळी प्रकल्प व्यवस्थापनाने आश्वासन दिलेले होते की स्थानिकांना व्यवसाय, नोक-या देऊ. येथे सुसज्ज हॉस्पिटल बांधून देण्यात येईल. मात्र कंपनीने एक दवाखाना सुरु केला. तोही आता बंद करुन तेथे अधिका-यांच्या वातानुकुलीत केबिन्स केलेल्या आहेत.

काही लोकांनी गाव सोडून विस्थापित होण्याची मानसिकता केलेली आहे. कारण रेडी गावाला मायनिंगशिवाय पर्याय नाही. बैठकीत मागणी करण्यात आली की मायनिंग करण्यास मर्यादा आहेत. पण माणसाच्या मागणीला मर्यादाच नाहीत. येथे साठ वर्षे मायनिंग चालू आहे, अजून किती वर्षे मायनिंग चालणार? तरी विस्थापित होण्याची टांगती तलवार थांबवा. आणि मायनिंग बरोबरच येथे शाश्वत विकास (Sustainable Development) रेडी परिसराचा कसा होईल याचे नियोजन करा. रेडी गावात मुबलक पाणी होते, नैसर्गिक स्त्रोत बंद झालेले आहेत, हवा शुध्द होती. लोक धुळीचे प्रदूषण सहन करत आहेत..

शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला, तर रेडी गाव मायनिंगमुळे उध्वस्त झाले हे कसे सरकारला दिसत नाही, सर्वेक्षणाची मागणी वारंवार करुनही ते होत नाही. यावेळेस स्थानिक विहिरींना खारे पाणी आलेले होते. तरीही स्थानिक म्हणतात की मायनिंगशिवाय पर्याय नाही.

तसेच शासनाचे कर्तव्य आहे की कंपन्या किती शब्द पाळतात हे वेळोवेळी तपासण्यात यावे.

धुळीचे प्रदूषण होते म्हणून तक्रारी करणा-या स्थानिकांच्या विरुध्द पोलिस केसेस लावून त्यांना वर्षानुवर्षे सडविले जाते. ३००-३५० व्यक्तींना रात्री २.०० – २.३० वाजता घरातून उचलून नेऊन पोलिस कस्टडीत टाकण्यात आले. त्यांना सोडवायला कोणी स्थानिक नेता, ग्रामस्थ आलेले नाहीत. त्यांनी काय गुन्हा केला, तर प्रकल्पातील धुळीबाबत तक्रारी केल्या. त्यावेळी चोवीस तास गाड्या येत असत. आज बारा तास येतात, तरीही आज धुळीचा त्रास कमी झालेला नाही. तरी धुळ नियंत्रणासाठी व पाणी खराब न होण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या पाहिजेत.

गेले काही दिवस गावागावातून पत्रके वाटून कंपनीच्या बाजूने लिहून स्थानिकांच्या बळजबरीने, आमिष दाखवून सह्या घेत आहेत. कंपनीने आश्वासन दिलेले होते की पिण्याचे पाणी मोफत पुरविण्यात येईल. मात्र आज प्रत्येक घर ते पाणी विकत घेत आहे. शासनास जर करोडो रुपयांचा महसूल मिळतो, तर येथे चोवीस तास वैदकीय सेवा उपलब्ध नाही ही आपली शोकांतिका आहे.

तरी हे विनाशकारी प्रकल्प थांबवावेत. जसे रायगड जिल्ह्यातील माळीण गाव एका दिवसात नाहिसे झाले, येथे तसे होईल. भविष्यात एक दिवस समुद्र हा गावात घुसेल. समुद्रात माती टाकून समुद्र हटवला, तर समुद्राचे पाणी हे वेंगुर्ला, देवबागमध्ये गेलेले आहे. देवबागमधील खूप बागांचे

नुकसान झालेले आहे. तरी म.प्र.नि. मंडळाने परिसराचा सर्वेक्षण करावे की किती धूळ गावात उडते. समुद्र किती आत देवबागला घुसला आहे,

जर ही कंपनी चांगली आहे, तर बैठकीत जे कंपनीस दुसरा व्यवसाय चालू करण्याचे पर्याय सूचविण्यात आलेले आहेत, त्यांचा कंपनीने विचार करावा.

१६) **श्री भूषण मांजरेकर, राहणार-६८५/अ, अन्नपूर्णा निवास, रेडी, म्हारतळेवाडी, वेंगुर्ला – ४१६ ५१०, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

प्रथम मला प्रश्न विचारायचा आहे की प्रधानमंत्री खनिजक्षेत्र कल्याण योजना रेडी गावास लागू आहे काय?
त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी संबंधित व्यक्तीस प्रश्न उपस्थित करण्याची सूचना केली.
श्री मांजरेकर यांनी विविध ठिकाणचे पाण्याचे नमुने व मानके (prescribed standards) व आलेले निष्कर्ष (results of analysis) वाचून दाखविले. त्यांनी सांगितले की सर्व पॅरॅमिटर्स हे मानकांपेक्षा जास्त आहे.
श्री मांजरेकर यांनी सांगितले की परिसरातील एवढी जैववैविधता नष्ट करुन स्थानिक फक्त १९ व्यक्तींना तर १०३ कंत्राटी व्यक्तींना नोकरी देणार आहेत. हे योग्य आहे का? आमचा पूर्णपणे या मायनिंगला विरोध आहे.
कंपनीच्या पर्यावरण सल्लागार यांनी तयार केलेला पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा पूर्णपणे खोटा व दिशाभूल करणारा आहे. तसेच ईआयए अहवालात दाखविण्यात आलेला नकाशा, सीआरझेड क्षेत्र, जमीनीचे क्षेत्र पूर्णपणे चुकीचे दाखविलेले आहे. ३६० मीटरवर सीआरझेड क्षेत्र दिसते. कंपनीने स्थानिक शेतक-यांच्या शेतात खनिजयुक्त पाणी सोडतात, कंपनी स्थानिकांची दिशाभूल करत आहे. रेडी येथील शेतकरी बांधवाच्या शेतात खारे पाणी जाते. मला या प्रकल्पाविषयी काहीही नाही, मी या प्रकल्पात नोकरी मागणार नाही. कंपनी प्रशासन गाव विकणा-या लोकांनासोबत घेऊन स्वतःचा फायदा करत आहेत. प्रकल्पास विरोध आहे. मी लेखी निवेदन सादर केलेले असून त्या मुद्द्यांवर लेखी उत्तर प्रकल्प प्रवर्तकांकडून देण्यात यावे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी श्री भूषण मांजरेकर यांना त्यांचा लेखी आक्षेप नोंदविण्याची सूचना केली. सदस्य यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना उपस्थितांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक मुद्द्यावर स्पष्टीकरण/उत्तर देण्याची सूचना केली –

प्रकल्प प्रवर्तक यांनी प्रत्येक मुद्दयांवर स्पष्टीकरण हे खालील प्रमाणे दिलेः-

१) **सरपंच यांनी** वैदकीय सुविधा पुरविण्याची सूचना केली. तर आता जी वैदकीय सुविधा उपलब्ध आहे तेथे वैदकीय अधिकारी हे आठवड्यातून तीन दिवस सेवा देतात. ती सेवा आता सहा दिवस देण्याची सूचना करण्यात आलेली आहे, येथे माहिती देण्यात येते की वैदकीय सुविधा उपलब्ध होती, पण तिचा उपयोग करण्यात येत नव्हता. तसेच कोणी दूरध्वनीवरुन मदत मागितल्यास त्यास वैदकीय अधिकारी ती त्वरित देतात. वैदकीय अधिकारी हे पूर्ण आठवडा आणि दिवसभर राहणार आहेत. मात्र चोवीस तास वैदकीय अधिकारी उपलब्ध राहणे हे सध्यातरी शक्य होणार नाही.

२) कंपनीने वॉटर फिल्ट्रेशन प्रकल्प उभारला असून तो कार्यक्षमतेने कार्यरत आहे. उपस्थितांनी कंपनी पिण्याचे पाण्याचे पैसे घेते असा आक्षेप नोंदविला. तर कंपनी पिण्याचे पाण्याचे पैसे घेत नाही.

तर ग्रामपंचायत ही शासकीय महसूल प्राधिकरण/विभाग आहे. कंपनी फिल्ट्रेशन करुन ग्रामपंचायतीस मोफत पाणी पुरवठा करते, ग्रामपंचायत जनतेकडून कर घेऊन पाणीपुरवठा करते. हीच पध्दत म्हणजे कंपनीकडून ग्रामपंचातीस मोफत पाणीपुरवठा ही भविष्यात चालू राहिल. कंपनीस ते पैसे मिळत नाहीत. तसेच कंपनीकडुन आश्वासन देण्यात येते की बागायती शेतीसाठी पाणी भविष्यातही चालू राहिल.

३) सरपंचांनी मागणी केली की खाण पुनर्भरण करुन त्यावर वृक्षारोपण केले पाहिजे – तर त्यास उत्तर म्हणजे कंपनीचा मायनिंग प्लॅन हा Indian Bureau of Mines कडून मंजूर केलेला असतो. खाण बंद करायच्या पाच वर्षे अगोदरच पुर्न:भरण करावेच लागते. खनिज खाणीत असताना सरकार पुनर्भरण करण्याची परवानगी देत नाही. तर अंतिम मायनिंग प्लॅनची नियमांनुसार अंमलबजावणी करण्यात येईल. Indian Bureau of Mines ची सर्व समिती येऊन पाहणी करते, नंतरच खाण बंद करण्यात येते. त्यांनी सर्टिफिकेट अदा करेपर्येत लिज ही अस्तित्वात असते.

४) बैठकीत स्थानिकांनी माईन्सऐवजी कंपनीने स्पॉंज आयर्न प्रकल्प, स्टील आयर्न कंपन्या चालू करण्याची मागणी केली. तर येथील स्थानिकांना माहित आहे की दोन स्टील आयर्न कंपन्या येथे सुरवात करण्यात आलेल्या होत्या. हा प्रश्न नेहमीच विचारला जातो की माईनिंगनंतर काय, तर आमचे अस्तित्व गेले वीस वर्षे असून येणा-या वीस वर्षात माईन्स बंद होणार नाही. पण माईन बंद झाल्यानंतर स्थानिक लोकांच्या रोजगारक्षमतेवर परिणाम होऊ नये म्हणून आम्ही पर्यटन क्षेत्रावर अभ्यास करत असून त्याबाबत निश्चितच सकारात्मक धोरण कंपनी घेऊ शकते. मात्र येथे आश्वासन देण्यात येते की स्थानिकांचा रोजगार हा निश्चितपणे कार्यरत राहणार आहे.

५) **<u>श्री प्रितेश राऊळ यांनी</u>** रोजगार निर्मितीबाबत विचारले. प्रत्येक माईन ही वेगळी असते. प्रकल्पात १२२ व्यक्तींना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळेल.
आता पर्यावरणाविषयी समस्यांबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला. तर प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण सल्लागार म्हणून NABET Approved आणि पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची मान्यता असलेली मिनरल इंजिनियरिंग सर्व्हिसेस, बेलारी, कर्नाटका यांची नियुक्ती केलेली आहे. त्यांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या निर्देशांनुसारच पर्यावरण आघात मुल्यांकन (Environment Impact Assessment) अहवाल तयार केलेला आहे. त्याची पूर्ण तपासणी केल्यानंतरच पर्यावरण अनुमती ही प्रदान करण्यात येते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळही वेळोवेळी सांडपाण्याचे नमुने गोळा करत असून त्याचे निष्कर्ष तपासत असते.

६) **<u>श्री प्रितेश राऊळ यांनी</u>** पुढे मागणी केली की शासनाचे सर्व नियम पाळून गावाचा विकास करण्यात यावा. गेले वीस वर्षे येथील स्थानीक लोक पहात आहेत की शासनाचे नियम काटेकोरपणे पाळूनच आम्ही विकास करत आहोत.

७) शासनाकडून मिळणा-या रॉयल्टीचा जास्तीतजास्त वापर हा गावाच्या विकासासाठी करण्यात यावा. हा विषय कंपनीच्या अखत्यारित नाही. जिल्हा खाण निधी हा शासनाच्या तिजोरीत परस्पर जमा होतो. शासन नियमाप्रमाणे त्याबाबत योग्य ती कार्यवाही शासन करेल.

८) **<u>नमिता संजय नागोळकर मॅडम</u>** या उपसरपंच आहेत. त्यांनी तिवरेवाडीच्या समस्या सोडविण्याबद्दल आणि खाणीच्या सभोवतालच्या वस्तींची काळजी घेण्याबद्दल सूचना केलेल्या आहेत. त्याची निश्चितच दखल घेण्यात येईल.

९) **मोबाईल टॉवर - नागोळकर मॅडम** उपसरपंच यांनी केलेली मागणी पहाता १-२ कंपन्याबरोबर प्रकल्प प्रशासन चर्चा करत आहे. त्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. त्यामुळे मोबाईल रेंज मिळू शकेल.

**नागोळकर मॅडम** उपसरपंच यांनी प्रकल्पात सुरक्षितता पाळण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तकांनी नॅशनल इन्स्टियुट ऑफ टेक्नॉलॉजी,सूरतकल, कर्नाटक यांना प्रकल्पातील सुरक्षिततेबाबत सल्ला देण्याबाबत नियुक्त केलेले आहे. ते येथे येऊन सर्वेक्षण व अभ्यास करतील. त्यांच्या अहवालानुसार व त्यांनी सुचविल्यानुसारच सुरक्षिततेबाबत उपाययोजना अंगिकारण्यात येतील. सुरक्षिततेबाबत कुठल्याच परिस्थितीत तडजोड करण्यात येणार नाही. मात्र जनतेने हे लक्षात घ्यावे की मागच्या वीस वर्षात सुरक्षिततेबाबत कुठलीच घटना आमच्या माईन्समध्ये घडलेली नाही. नॅशनल इन्स्टियुट ऑफ टेक्नॉलॉजी,सूरतकल, कर्नाटक राज्य ही अशी संस्था आहे की तेथे भारतातील सर्वात जास्त मायनिंगबाबत परिपूर्ण प्रशिक्षण व सल्ला देणारी संस्था आहे.

१०) **चित्रा कनयाळकर माजी सरपंच** यांनी सांगितले की आरोग्य, दळणवळण, रोजगार निर्मिती याची उपलब्धता करुन द्यावी. तर त्यास उत्तर जास्तीतजास्त स्थानिक लोकांना रोजगाराची संधि देण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रकल्पाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदा हा गावातील लोकांनाच देणार आहोत.

११) **चित्रा कनयाळकर माजी सरपंच** यांनी विचारले जी जागा आमच्या नव्या मायनिंगमध्ये नाही, तर त्या दहा हेक्टर जागेचे काय? तर ७/१२ वर ज्यांची नांवे आहेत, त्यांचीच नांवे राहतील. आम्हांला बदल करण्याचा अधिकार नाही.

१२) **चित्रा कनयाळकर, माजी सरपंच** यांनी मत मांडले की महिला सक्षमीकरण व सबलीकरण यासाठीचा पाच लाख रुपयांचा राखीव निधी कमी प्रमाणात आहेत. तो वाढविण्यात यावा. तर त्यांची सूचना ही स्विकारण्यात येत असून निधीची रक्कम वाढविण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तक याबाबत निर्णय घेतील.

१३) **श्री गोपाळ पांडुरंग राऊळ** यांनी सांगितले की कंपनी चांगले काम करत असून भविष्यात असेच सामाजिक काम करत राहावे. तर आम्ही आश्वासन देतो की आम्ही असेच काम करत राहू.

१४) **सौ. सायली संतोष पोखरणकर, माजी उपसरपंच यांनी** पाण्याच्या बाबतीत प्रश्न विचारले. त्याचप्रमाणे बैठकीत पाईपलाईन खराब झाल्याचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला. २०२१ मध्ये कंपनीने स्वतःच्या खर्चाने २५० मीटर्स पाईपलाईन ग्रामपंचायतीस टाकून दिलेली होती. तसेच २०२३ मध्ये पाच कि.मी. पाईपलाईन नविन टाकून दिलेली आहे. त्याचे पाणी आमचे अधिकारी व कर्मचारीसुध्दा पितात. तरी कुठे पाण्याची गळती असेल, किंवा पाण्याचा प्रवाह जाण्यास काही अडचणी येत असतील, तर ते निदर्शनास आणून दिले की आम्ही त्याबाबत पुढील कार्यवाही करत असतो. तर आता पूर्णपणे पाच कि.मी. पाईपलाईन बदलून दिलेली आहे.

१५) **श्री दयानंद कृष्णाजी** यांनीसुध्दा रोजगाराबाबत प्रश्न विचारला. तर लोकसंख्या भरपूर आहे, सर्वांनाच रोजगार मिळेल असे नाही, शासनाससुध्दा ते शक्य होत नाही. तरीही कंपनी प्रशासनाचा प्रयत्न आहे की जास्तीतजास्त स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध व्हावा.

१६) **श्री पराग शिरोडकर यांनी** गावाला जोडणारा मुख्य रस्ता- माऊली कनयाळ गावांना जोडणारा रस्ता व स्थानिकांना रोजगार याबाबत मुद्दे उपस्थित केले. तर रस्त्याबाबत काही अडचणी असतील तर कंपनीची जी स्थानिक समिती/संघ आहे, त्यांच्याशी संपर्क साधण्यात यावा. कंपनी चांगले कामे करत असून अजून चांगली कामे करण्याचा प्रयत्न कंपनी करत आहे.

१७) **श्री सागर राऊळ यांनी** आढावा बैठक घेण्याविषयी सूचना केली, तर आढावा बैठक वेळोवेळी आयोजित करण्यात येतात. येथील स्थानिक लोक येतात, आपले प्रश्न संबंधित अधिका-यांना मांडतात. त्यावर तोडगा काढण्यात येतो.

१८) **श्री राजेन्द्र कांबळी यांनी long term** विचार करुन कंपनीने स्पॉंज आयर्न प्रकल्प, स्टील आयर्न कंपन्या चालू कराव्यात अशी सूचना केली. तर त्याच्यासाठी कोळसा, ब्लास्ट फरनेस लागते. तर स्टील कंपनी ही मायनिंगपेक्षा जास्त प्रदूषण करु शकते, कारण त्यांच्या कार्बन फूट प्रिंट ह्या जास्त होतात. तरीही आपण दिलेल्या सूचनेबद्दल स्वागत. कंपनी प्रशासन त्याची सर्व बाजूंनी अभ्यास करेल.
त्यांनी बॅक फिलिंग करण्याबाबत सूचना केल्या. त्याबाबत सविस्तर उत्तर देण्यात आलेले आहे. Indian Bureau of Mines च्या निर्देशांनुसार बॅक फिलिंग करणार आहोत.

१९)**श्री दत्तात्रय कामत यांनी** सीआरझेड ५०० मीटर्सबाबत प्रश्न उपस्थित केला. भारत सरकारच्या पाच संस्था आहेत, फक्त त्यांनाच सीआरझेडबाबत सर्वेक्षण, अभ्यास करण्याची परवानगी आहे. येथील सर्वेक्षण Institute of Remote Sensing (IRS), अण्णा युनिव्हर्सिटी,चेन्नई यांनी दिलेल्या अहवालानुसारच ५०० मीटर लाईन निश्चित करण्यात आलेली आहे. म्हणून महाराष्ट्र शासनाने दहा हेक्टर काढून २४ हेक्टरबाबत लिलाव केलेला आहे. तर उर्वरित जमीन ज्याची मालकी असेल, त्यांना ती परत मिळेल.

२०) **श्री दत्तगुरु भगत यांनी** रोजगारनिर्मिती कशी वाढेल याबाबत प्रश्न विचारले. याबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. संबंध हे दोघांमध्ये जे विकसित झालेले आहेत, ते ठेवण्यात येईल.

२१) **श्री संतोष व्यंकटेश नाईक हे** अन्न. वस्त्र व निवारा बाबत बोलले. त्यांचे असे मत आहे की प्रकल्प कार्यान्वित झाला पाहिजे. गाव नेहमीच कंपनीस सहकार्य करते. मात्र संबंध हे दोघांकडून हवेत. दोघांनाही संबंध ठेवावे लागते. काही शैक्षणिक प्रश्न असतात, त्याचे निराकरण करण्यात यावे. शाळेला गणवेश पुरविणे, गरीब मुलगा असल्यास त्याला शिक्षणासाठी आर्थिक मदत केलेली आहे. शिक्षणाबाबत प्रत्येकास त्या त्या गोष्टींची पूर्तता केलेली आहे. भविष्यातही ही कृती चालू राहणार आहे.

२२) **निलेश रेडकर यांनी** सांगितले मायनिंग महत्वाचे आहे ट्रक व्यवसायही महत्वाचा आहे. त्यांनी २४X७ हॉस्पीटलची सुसज्ज सेवा उपलब्ध करण्याबाबत मागणी केली. कंपनीने आता दिवसभर सात दिवस हॉस्पिटल कार्यरत राहणार असून आपत्कालिन स्थितीत केव्हाही हॉस्पिटलमध्ये फोन करु शकता, आपणास वैदकीय मदत मिळेल. त्याचप्रमाणे रुग्णवाहिका ही पूर्णवेळ उपलब्ध आहे. कंपनीतर्फे जनरल मेडिसीन मोफत उपलब्ध आहेत. तसेच बेसिक चेकअप मोफत.

२३) **श्री भूषण मांजरेकर यांनी** उपस्थित केलेल्या सर्व आक्षेपांना उत्तर देताना सांगण्यात येते की आम्ही सर्व पर्यावरणीय निर्देश पाळत असून पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी मान्यता दिलेल्या प्रयोगशाळेतूनच आम्ही आमचे नमुने हे तपासून घेत आहोत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यात आलेली आहे.

त्यावेळी एक उपस्थितांनी सांगितले की माझे घर ग्रामपंचायतीसमोर आहे. पहाटे तीन वाजता वाघाने वासरू ओढून नेले. चार दिवसांपुर्वी हे सर्व खाणींच्या खड्ड्यांमुळे झालेले आहे. रानटी जनावरे सर्व बागायती शेतीची नासाडी करतात.

दुस-या उपस्थितांना आक्षेप नोंदविला की प्रकल्पासाठी झाडे तोडली. आम्ही मायनिंगला विरोध करत नाही. पण आम्हांला होणा-या त्रासाचाही विचार करण्यात यावा.

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जैव-वैविधता, जंगलसंपती आणि जंगलजनजीवन याबाबत विचार करणे महत्वाचे आहेत. लोकांनी विचार मांडले ते चुकीचे नाहीत. त्यांना माहिती मिळणे आवश्यक आहे. एका उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की एकानेही प्रकल्पामुळे होणारा जंगली जनावरांचा त्रास व त्यावर उपाययोजना याबाबत माहिती सांगितली नाही. सदस्य यांनी या मुद्द्याची नोंद इतिवृतात घेण्याची सूचना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना आदेश दिले की उपस्थितांनी जे प्रश्न विचारले, त्या प्रश्नांना लेखी स्वरुपात उत्तरे प्रकल्प प्रवर्तक यांनी द्यावी.

अध्यक्ष यांनी सांगितले की सदस्य यांनी जैव-वैविधता, जंगलसंपती आणि जंगलजनजीवन याबाबत विचार करणे महत्वाचे आहे ही केलेली सूचना बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात यावी. त्यांना ठोस उत्तरे लेखीस्वरुपात कंपनीकडून देण्यात यावीत. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की येथे जैव-वैविधता बाबत स्थानिकांनी आक्षेप नोंदविले. तर त्यास स्पष्टीकरण देण्यात येते की पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवालासाठी अभ्यास करताना प्रकल्पाच्या १०.० कि.मी. परिघात असलेल्या कुठल्याही झाडांची प्रजाती, तेथील जनावरांची प्रजाती त्याचा अभ्यास होतो व त्याची प्रत ही विविध अधिसूचित शासकीय विभागांना उपलब्ध करण्यात आलेली आहे. आता उपस्थितांनी wild bore चा उल्लेख केला. त्यामध्येच एक भाग असतो Wild Life Conservation Plan. तो Wild Life Conservation Plan with budgetary provisions दिलेले आहेत. ते पान नं. १६८ वर आहे. त्याचप्रमाणे पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याअगोदर आम्हांला Chief Wild Life Conservation of Forest यांची परवानगी घ्यावीच लागते.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी श्री भूषण मांजरेकर यांना सांगितले की आपले सर्व मुद्दे हे एकदाच सांगा. त्याप्रमाणे श्री भूषण मांजरेकर यांनी पुढील ५० वर्षांचा विचार करुन जे प्रश्न विचारले, त्यांना उत्तरे लेखी स्वरुपात देण्यात यावीत. तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवालाची प्रत ही श्री भूषण मांजरेकर यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच जी आढावा बैठक घेण्यात येईल, त्यात तो अहवाल श्री भूषण मांजरेकर यांना समजून सांगण्यात यावा. त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांचे निरसन करण्यात यावे.

श्री भूषण मांजरेकर यांनी मागणी केली प्रथम मिनरल इंजिनियरिंग सर्व्हिसेस, बल्लारी, कर्नाटका यांची प्रथम चौकशी व्हायलाच पाहिजे कारण त्यांनी बोगस, दिशाभूल करणारा अहवाल दिला.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की हा अहवाल NABET Accredited Consultant करु शकतो, दुसरा कोणालाही करण्याची परवानगी नाही. मिनरल इंजिनियरिंग सर्व्हिसेस, बेल्लारी, कर्नाटका यांनी आमच्या इतर शाखांचाही ईआयए अहवाल तयार केलेला आहे. सदरहू कंपनीस भारत सरकारची मान्यता आहे. म्हणून त्यांचा अहवाल हा स्विकारण्यात येतात. प्रकल्प प्रवर्तक यांनी उपस्थितांना आवाहन केले की या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीनंतरही आपण आपल्या सूचना, आक्षेप नोंदवू शकता, त्यास लेखी उत्तर देण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की संबंधित व्यक्तींनी ईआयएचा अभ्यास केलेला असून प्रश्न विचारलेले आहेत. ईआयए अहवालात त्यांना ज्या ब-याच त्रुटी वाटत आहेत, त्याविषयीच श्री भूषण मांजरेकर यांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. तरी त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांवर लेखी स्वरुपात दोन दिवसात उत्तरे लेखीस्वरुपात देण्यात यावीत.

त्यावेळी काही उपस्थितांनी एकत्रित सर्व मागणी लेखी स्वरुपात मिळण्याची मागणी केली. त्यास अध्यक्ष व सदस्य यांनी ती कंपनीला द्यावी लागेल असे सांगितले.

**त्यावेळी सायली पोखरणकर यांनी** सांगितले की आता जसा आदेश देण्यात आला, तसाच आदेश मा. जिल्हाधिकारी मॅडम यांनी मागच्या जनसुनावणीत दिलेला होता की ग्रामस्थांना कुठले क्षेत्र हे खाणीचे, कुठले क्षेत्र निवासी हे दाखविण्यात यावे. त्याबाबत आजपावेतो कंपनीकडून कार्यवाही झालेली नाही. तर आता आपण दिलेला हा आदेश कंपनी पाळतील का?

त्यावेळी **सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी** सांगितले की पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समितीचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग असून त्यांच्या परवानगीने सांगतो की माजी सरपंच, उपसरपंच, तसेच महिला सक्षमीकरण व इतर सर्व मुद्दे, सर्वांत महत्वाचा मुद्दा आहे पुनर्भरण, हरित पट्टा विकास, रस्ते दुरुस्ती व रस्तेविकास, हवा प्रदूषण - पीएम १०, पीएम २.५ या मानकांची मर्यादा ओलांडणे, हॉस्पिटल, स्थानिक झाडांच्या प्रजाती, स्थानिक प्राण्यांच्या प्रजाती, रानडुकरे, जंगली प्राण्यांमुळे शेताची नासाडी इ.मुद्दे आणि विद्यामान सरपंच यांनी मांडलेले अनेक मुद्दे आहेत. हॉस्पिटल कशाला पाहिजे, त्याऐवजी आपण आपली प्रगती करु या, प्रकल्पातील धुळीच्या नियंत्रणासाठी रस्त्यांवर पाणी मारले जाते का, ह्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. स्थानिकांची अपेक्षा आहे की आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने व भारत सरकारने पारित केलेल्या

निर्देशांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी. आपण हॉस्पिटलसुध्दा उभे करावे. पण त्यापूर्वी टँकर जात असताना रस्त्यावर पाणी मारले जाते का, धूळ किती प्रमाणात उडते याचा सर्व अभ्यास आपण ईआयए अहवालात केलेला आहे, तर त्याची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. स्थानिकांनी आपण पर्यावरण कायदे अंमलबजावणी करावी अशी मागणी आहे. आपण वस्तूस्थिती जाणा व स्थानिक जनतेच्या मागणीनुसार पर्यावरण संरक्षण कायद्यांची अंमलबजावणी करा.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सर्व उपस्थितांचे आभार मानताना सांगितले की बैठकीत प्रश्न विचारणा-या स्थानिकांची संख्या जास्त होती, पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) अहवालाबाबत स्पष्टीकरण मागणा-यांची संख्या जास्त होती. मांडलेल्या सूचना, आक्षेप हे मुद्देसुद आहेत. विद्यमान सरपंच,उपसरपंच, माजी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक नागरीक यांनी चर्चेत भाग घेतला व विविध प्रश्न विचारलेले आहेत. जवळजवळ तीन तास ही जनसुनावणी बैठक चालू आहे. सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना ईआयए अहवालातील त्रुटी, परिसरातील जैव-वैविधता याबाबत सूचना केलेल्या आहेत. त्याबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू ईआयए अहवाल शासनाच्या अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेला होता. तरी उपस्थितांना आवाहन करण्यात येते की आपल्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय सूचना, आक्षेप असल्यास त्या दोन दिवसात सादर करु शकतात. निश्चितच काही ठिकाणी सुधारणा करण्यास वाव आहे. जवळजवळ साठ वर्षे रेडीगाव आणि माईन्स यांचा संबंध आहे. गेले वीस वर्षे ही कंपनी कार्यक्षमतेने कार्यरत आहे. कोकण म्हणजे पर्यावरण हे ब्रीद वाक्य धरुन कंपनीने आपली खाण चालवावी. बैठकीत काही उपस्थितांनी मत मांडले की कंपनीच्या प्रदूषणाबाबत विधी सल्ला घेऊन पुढील कारवाई करता येईल, मात्र आम्हांला तसे करायचे नाही. कंपनीने पर्यावरण कायद्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करावी. रोजगार, विकास स्थानिकांना हवा आहे. मात्र रोजगार व पर्यावरण ही पुरक बाब व्हावी. सादरीकरणात प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की खाणउद्योगाबरोबरच सदरहू व्यवसाय पर्यटन क्षेत्राकडे वळविण्याचा त्यांचा मानस आहे. महाराष्ट्र शासनाने गेले २५ वर्षांपूर्वीच सिंधुदुर्ग हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा समृध्द आहे, कारण तो पर्यावरणामुळे समृध्द आहे. ते लक्षात घेऊनच कंपनीने काम करावे.

उपस्थितांनी ज्या सूचना नोंदविल्या त्यात मुख्यत्वे खड्ड्यांचे पुनर्भरण, स्थानिकांना रोजगार, पिण्याचे पाणी उपलब्ध करणे आहेत. जिल्हा खनिज निधी (DMF) बाबत सूचना उपस्थित केलेल्या आहेत. रेडी गावास निधी मिळण्यासाठी जिल्हास्तरावर निश्चितच प्रयत्न करण्यात येईल. कंपनीने पाच कि.मी. पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकलेली आहे. तसेच प्रकल्पात सुरक्षिततेबाबत कुठलीच तडजोड करण्यात येणार नाही, याची त्यांनी ग्वाही दिलेली आहे. तरी ईआयए अहवालाचे आपण पालन करावे. कोकणात विशेषतः तळ कोकणात जैव-वैविधता ही टिकून आहे. त्याचे नुकसान न होण्याची जबाबदारी कंपनीची आहे. साठ वर्षे मायनींग आणि रेडी गाव यांची सांगड आहे, तर पर्यावरणाची काळजी घेऊन ही सांगड तुटणार नाही यांची काळजी कंपनीने घ्यावी. सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी केलेल्या सूचनांचे कंपनीने पालन करावे. उपस्थितांनी केलेल्या सूचना, आक्षेप

याचे निराकरण करावे. त्यांनी आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांना बैठकीचा समारोप करण्याची सूचना केली.

आयोजक यांनी सर्वांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त ८० लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहे.

**(राहूल दे. मोटे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
रत्नागिरी

**(जगन्नाथ शं. साळुंखे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी-कोल्हापूर
महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(मच्छिंद्र सुकटे)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग
जिल्हा - सिंधुदुर्ग